कृषीवल
रायगड, बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६
किंमत ४ ₹

## रायगडसाठी स्थानिक सुट्ट्या जाहीर

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील महसूल हद्दीमध्ये शासनाच्या सर्व खात्यांमधील कार्यालयांकरिता ३ स्थानिक सुट्ट्या जाहीर करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार सन-२०२६ या वर्षाकरिता सोमवार, दि.०२ मार्च २०२६ रोजी होळी, शुक्रवार, दि.२८ ऑगस्ट २०२६ रक्षाबंधन, शुक्रवार, दि.२५ सप्टेंबर २०२६ रोजी अनंत चतुर्थी या तीन स्थानिक सुट्ट्यांची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

## दिघी पोर्टचा वेगाने विस्तार

# स्थानिक बेरोजगार

संदेश घोलप
| श्रीवर्धन |

**रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दिघी पोर्ट विस्तार प्रकल्पावरून आता स्थानिकांच्या संतापाचा स्फोट होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. हजारो कोटींची गुंतवणूक, मोठ्या प्रमाणावर विस्तार आणि विकासाच्या घोषणा होत असताना स्थानिक तरुण मात्र बेरोजगारीच्या खाईत ढकलले गेले असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात आला आहे. हा प्रकल्प अदानी समूह यांच्या ताब्यात गेल्यानंतर विकासाचा वेग वाढला, पण स्थानिक रोजगाराचा प्रश्न अधिकच गंभीर झाला असल्याचेही स्थानिकांकडून सांगितले जात आहे.**

सध्या पोर्ट परिसरात मोठ्या प्रमाणावर विस्तारकामे सुरू अज्ञहेत. आधुनिक यंत्रसामग्री, मोठे लॉजिस्टिक नेटवर्क आणि नवे बांधकाम प्रकल्प उभे राहत असताना स्थानिक सुशिक्षित तरुण मात्र रोजगारासाठी गाव सोडून बाहेर भटकताना दिसत आहेत. त्यामुळे प्रकल्प येण्यापूर्वी स्थानिक

### आकडेवारी गुप्त का?

पोर्टमध्ये एकूण कर्मचारी किती? त्यात स्थानिक किती? बाहेरील किती? या साध्या प्रश्नांची स्पष्ट अधिकृत आकडेवारी सार्वजनिक का केली जात नाही, असा सवाल सातत्याने उपस्थित केला जात आहे.




**स्थानिक संघटना आणि युवकांचा दावा**

- तांत्रिक आणि उच्च पदांवर बाहेरील राज्यांतील उमेदवारांचे वर्चस्व
- स्थानिकांना प्रामुख्याने कंत्राटी, तात्पुरती आणि कमी वेतनाची कामे
- नोकरीत शाश्वतता आणि करिअर वाढीच्या संधींचा अभाव

### 1 मदत नको, रोजगार हवा

पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, शैक्षणिक मदत असे सामाजिक उपक्रम राबवले जात असल्याचे सांगितले जात असले तरी स्थानिकांचा सूर आता अधिक तीव्र झाला आहे. प्रकल्पग्रस्त आणि स्थानिक बेरोजगारांना किमान ८० टक्के रोजगार देण्याची मागणी आता जोर धरत आहे. अनेकदा आंदोलनाचे इशारे देण्यात आले. मात्र निर्णय प्रक्रिया आणि अंमलबजावणी यामध्येच प्रश्न अडकून राहिल्याची टीका स्थानिक पातळीवर होत आहे.

### 2 विकास कोणाचा? प्रश्न स्थानिकांचा

रायगड जिल्ह्यात औद्योगिक विकास झाला, हे वास्तव कोणी नाकारत नाही. मात्र विकासाच्या या मोठ्या चित्रात स्थानिक तरुणांचा सहभाग कुठे आहे? विकासाच्या नावाखाली स्थानिकांचा हक्क बाजूला तर पडत नाही ना, हा प्रश्न आता अधिक तीव्र होत चालला आहे.

### 3 संताप उफाळल्यास जबाबदार कोण?

स्थानिक तरुणांना रोजगाराचा न्याय्य वाटा न मिळाल्यास भविष्यात मोठे आंदोलन उभे राहू शकते, अशी चर्चा स्थानिक स्तरावर सुरू झाली आहे. विकास आणि रोजगार यामधील समतोल साधला गेला नाही, तर परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## डोक्यात दगड घालून हत्या

**पनवेल :** पनवेल शहराजवळील गांधी हॉस्पिटल समोरील उड्डाणपुलाखाली अज्ञात कारणावरून एका इसमाच्या डोक्यात दगड घालून हत्या केल्याची घटना सोमवारी मध्यरात्री घडली. पनवेल शहराजवळील गांधी हॉस्पिटल समोरील उड्डाणपुलाखाली विजय हा नेहमी नाका कामगार येथे कामासाठी उभा राहत असे व प्रामुख्याने कॅटरिंगची पडेल ती कामे करत असे, तसेच त्याला देशी दारू पिण्याचे व्यसन होते. सोमवारी रात्री अज्ञात कारणावरून अज्ञात इसमाने त्याच्या डोक्यात दगड घालून त्याची निघृण हत्या केली व तेथून तो पसार झाला.

## नेरळमध्ये भीषण अपघात



| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावर पोशिर गावाजवळ आज सकाळी चार चाकी वाहनाला अपघात झाला. भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अलिशान कारचा ताबा सुटल्याने गाडी थेट झाडावर आदळली. या भीषण धडकेत गाडीच्या दर्शनी भागाचा अक्षरश चक्काचूर झाला आहे. मात्र सुदैवाने गाडीतील एअरबॅग्स वेळेवर उघडल्याने चालक आणि त्यांच्यासोबत पान २ वर

## अलिबाग-रोहा मार्गाबाबत उपजिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

# दिवसा काम बंद

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

अलिबाग - रोहा मार्गावर सुरू असलेल्या रस्ते, गटारे आणि क्रॉसड्रेनच्या कामांमुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असून, याचा थेट फटका शालेय विद्यार्थ्यांना बसला.सोमवारी झालेल्या वाहतूक कोंडीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षेलापोहोचणेकठीणझालेहोते. त्यामुळे संतापलेल्या पालकांसह नागरिकांच्या संतापाचा आक्रोश झाला. दिवसभर नागरिकांनी प्रशासन तसेच ठेकेदाराला फैलावर घेतले होते. त्यातच चिंतामणराव केळकर विद्यालयाचे अध्यक्ष अमर वार्डे यांनी प्रशासनाला निवेदन देत आंदोलनाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर २ हजार विद्यार्थ्यांसह आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी तातडीचे आदेश देत परीक्षा कालावधीत दिवसा रस्त्याचे काम बंद करण्याचा निर्णय घेतला.

अलिबाग शहराच्या हद्दीबाहेरील कुरूळ ते सुडकोली, कुरूळ-आक्षी मार्गे रेवदंडा आणि रेवदंडा बायपास रोड या ठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू आहे. मात्र, या कामांबाबत गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत.



**प्रशासनाचा निर्णय**

निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता दिलीप हिंगे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. या चर्चेत रात्री काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. परीक्षा कालावधी लक्षात घेता, विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी दिवसा रस्त्याचे काम पूर्णपणे थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कामाच्या व्यापात ही समस्या पान २ वर

ऐकू कमी येते का?
ऐकू कमी येणाऱ्या व्यक्तींसाठी...
कानाचे मशीन श्रवण यंत्र...
ऑफर फक्त आजच
रुपये ३५००/-
पाच वर्षाची गॅरंटी

ऋषिकेश मार्केटिंग
मशीन तुम्हाला चार दिवसांमध्ये घरपोच कुरिअरने मिळते.
नाव, पत्ता, पिन कोड सहित व्हाट्सअप करावा.
आजच फोन करा
7387447577



# गोमुख किनारा विकासाच्या प्रतीक्षेत



> गायमुखावर निसर्गाचा खराखुरा आनंद घेण्यासाठी आमच्या घरातील आजोबांपासून ते मी त्यांची नातं आजही जाते. सायंकाळी लालसर सूर्यप्रकाशात समुदाच्या लाटांना जोर असतो. त्यावेळी समुद्राचे पाणीदेखील सोनेरी होताना मी पहिले आहे. इतक्या सुंदर पर्यटनस्थळाचा विकास का होत नाही? या ठिकाणी येण्यासाठी पहिला अधिकृत रस्ता करण्यात यावा. ज्येष्ठ नागरिकांना जाताना खूप त्रास होतो.
>
> – अर्चना नवले (पर्यटक )

**सुधीर नाझरे**
**। मुरुड जंजिरा ।**

रायगडचे दक्षिण काशी म्हणून समजले जाणारे मुरूड जंजिरा एकदरा डोंगरापलीकडे समुद्रकाठी वसलेले शंकराचे पवित्र स्थान म्हणजे गोमुख (गायमुख). येथील परिसर इतका सुंदर आहे कि गोमुख समोर विशाल भव्य लाटा असलेला समुद्र, डाव्या बाजूस अभेद्य जंजिरा किल्ला, उजव्या बाजूस पद्मदुर्ग किल्ला काळ्या खडकात डोंगराच्या कपारीत वसलेले हे गोमुख पर्यटकांना अतिशय आवडते ठिकाण आहे. शंकराचे जागृत स्थान असल्याने महाराष्ट्रातून येथे अस्थी विसर्जनासाठी लोक येतात. सूर्यास्तावेळी दगडावर बसून ध्यानधारणा करण्यासाठी अनेक भक्त रोज हजेरी लावतात. अशा विशेष पर्यटनस्थळाला विकासासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे

खासदार सुनील तटकरे यांनी एकदरा पूल ते गोमुख मार्गे खोरा बंदर रस्ता करून परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी प्रस्ताव तयार केला.परंतु पुढे कोणतीही हालचाल झाली नाही. जर तो प्रस्ताव मंजूर होऊन प्रत्यक्षात आला तर मुरूडला दाखवण्यासारखे १ पर्यटन स्थळ होईल. मुरुडला येणारा प्रत्येक पर्यटक खोरा बंदराला भेट देतो.त्यातूनच तो खोरा बंदरच्या मागीलबाजूस जाऊन समुद्राच्या लाटांचा आनंद घेत गायमुखाचे दर्शन करेल आणि मुरुडच्या सुंदर समुद्रकिनारी उतरेल अशी संकल्पना तटकरे यांची होती. ती पूर्ण व्हावी, अशी मुरूडकरांची मागणी आहे. गोमुखावर महाशिवरात्रीला सकाळपासून भक्तांची दर्शनासाठी रांग लागते. सध्यस्थितीत भक्तांना एकदरा गावातून खराब रस्त्यावरुन चालत जावे लागते. सुशोभिकरणाचा प्रस्ताव झाला तर भक्त व पर्यटक आपली गाडी गोमुखाच्या जवळील परिसरात घेऊन जाऊ शकतात. या निसर्गातील अजुब्याचे दर्शन घेऊ शकतात. नुकतेच नवी मुंबई येथील रंगलर ग्रुपने फिशिंग रोडने मासेमारीच्या स्पर्धा गायमुख परिसरात घेतल्या शेकडो पर्यटक व मासेमारी प्रेमींनी सहभाग घेऊन पर्यटन चालना दिली. आलेल्या पर्यटकांना किनारा खूप आवडला हा परिसर विकास करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर केला अत्याचार

**। पनवेल । वार्ताहर ।**

एका महिलेशी ओळख वाढवून तिला लग्नाचे खोटे आमिष दाखवित तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. अक्षय पाटील (३३) असे या प्रकरणातील आरोपीचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

पीडित महिला आणि आरोपी अक्षय हे दोघेही घटस्फोटीत असून या दोघांनी एका मॅट्रिमोनिअल वेबसाईटवर लग्नासाठी नोंदणी केली होती. नोव्हेंबर २०२५ मध्ये आरोपी अक्षयने पीडित महिलेशी ओळख वाढवून तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर त्याने पीडित महिलेचा विश्वास संपादन करत,तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. तसेच त्याने व्यवसायासाठी आणि वैयक्तिक अडचणींचे कारण सांगून पीडित महिलेकडे वेळोवेळी पैशांची मागणी केली.

## पेण शहराला बसणार पाणीटंचाईचे चटके



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहराच्या लोकसंख्येचा विचार करता पेण शहरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण वाढत आहे. त्यामुळे अनेक नागरी सुविधांवर त्याचा ताण पडत आहे. असे असले तरी, गेली दहा ते पंधरा वर्षापासून पेण शहरात केव्हाच पाणी टंचाईचा प्रश्न उद्‌भवला नाही. कारण नोव्हेंबर च्या शेवटच्या आठवड्यात अथवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात हेटवणे धरणातुन कालव्याला पाणी सोडला जात असत आणि या कालव्याचा पाणी मोठ्या प्रमाणात भोगावती नदीमध्ये येत असत त्यामुळे भोगावती नदी बारमाही दुथडी भरून वाहत असत. परंतु या वर्षी हेटवणे धरणाच्या कालव्याचे काम सुरू असल्याने कोणतीच कल्पना न देता पाणी पुरवठा बंद केल्याने भोगावती नदी तळ गाठू लागली आहे.

आजच्या स्थितीला पिंपळडोहात असलेल्या पाण्याच्या साठ्याचा विचार करता तो साठा पुढील पंधरा दिवस पुरणार आहे. मशीनसाठी लागणारे पाणी आजही कमी पडत आहे. यावर्षी जॅकवेल पासुन खालच्या बाजुला दोन ते अडीच फुट पाणी फेब्रुवारी महिन्यातच कमी झाले आहे. त्यामुळे येत्या पंधरा दिवसात पेण शहरावर पाणी संकट येण्याचे संकेत आताच दिसू लागले आहे. यावेळी नगरपालिका पाणी विभागाचे प्रमुख रमेश देशमुख यांनी सांगितले आहे की, भोगावती नदी पात्रात पुढचे दोन ते तीन आठवडे पाणी पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध असुन जर हेटवणे धरण अथवा आंबेगाव धरणातुन पाण्याचा स्त्रोत भोगावती नदीमध्ये सोडला नाही तर शहरात पाणी कपात करावी लागेल.

## पुन्हा भगवं वादळ घोंघावणार?

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. गॅझेटिअरचा जीआर काढल्यानंतरही प्रमाणपत्र वाटप होत नसल्याबद्दल त्यांनी सरकार आणि प्रशासनाला सवाल केला आहे. सरकार मोठं की अधिकारी मोठे? असा थेट प्रश्न जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. तसेच अधिवेशनानंतर ठोस निर्णय झाला नाही तर पुन्हा आंदोलन उभे करण्याचा इशाराही जरांगे पाटलांनी सरकारला दिला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि विखे पाटील यांनी मराठवाड्यातील सर्व मराठे कुणबी असल्याचे मान्य करून गॅझेटनुसार आरक्षण देऊ असे म्हटले होते. मात्र अर्ज देऊनही प्रमाणपत्र आणि व्हॅलिडिटी जाणून बुजून दिली जात नाही, असा आरोप जरांगे पाटलांनी केला. पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, शिंदे समितीला मुदतवाढ देऊनही नोंदी का सापडत नाहीत? याचे उत्तर द्यावे; अन्यथा आंदोलन अपरिहार्य होईल. त्यामुळे आता आगामी काळात जरांगे पाटील मराठा समाजासाठी रस्त्यावर उतरल्यास सरकारची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे.

# राजिपतर्फे शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यशाळा



**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम ंतर्गत प्रथम फाउंडेशन व महानगर गॅस प्रा. लि. यांच्या सहकार्याने अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी हॉल येथे जिल्ह्यातील केंद्रप्रमुख, शिक्षक, गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शिक्षणाधिकारी प्राथमिक ललिता दहितुले, उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, विस्तार अधिकारी कल्पना काकडे, निपुण महाराष्ट्र जिल्हा समन्वयक क्षमा खेडेकर, जिल्हा समन्वयक निनाद नागले, प्रथम फाउंडेशनचे राज्य कार्यक्रम प्रमुख शंकर पौळ यांच्यासह एकूण १७० केंद्रप्रमुख, शिक्षक व गटशिक्षण अधिकारी कार्यशाळेसाठी उपस्थित होते. रायगड जिल्हा परिषदेमार्फत शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि डिजिटल शाळा, पायाभूत सुविधा, व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींवर लक्ष केंद्रित केले जात आहे. आधुनिक अध्यापन पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वापर याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी सोमवारी अलिबागमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

राजिपच्या इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची भाषा व गणित या विषयाच्या घेण्यात आलेल्या परीक्षेच्या प्रगतीचा आलेख यावेळी सादर करण्यात आला व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्याच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर शिक्षक, केंद्रप्रमुखांना आधुनिक अध्यापन पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने भाषा व गणित या अंतर्गत येणाऱ्या सर्व विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आकलन क्षमता वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, याबाबत चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. ओपन लिंक फाउंडेशन यांच्यामार्फत समन्वयक वैभव शिर्के यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर शिष्यवृत्ती सराव परीक्षा व गुणवत्तेसाठी चांगले काम करणाऱ्या एकूण ११ शाळा तसेच पोस्ट ऑफ मंथ ठरलेल्या ७ शिक्षक व ३ केंद्रप्रमुखांचा सन्मान करण्यात आला.

# शिमग्यासाठी लालपरी सज्ज

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गाव तेथे एसटी या ब्रीद वाक्यानुसार महानगर आणि खेडेगावांना लालपरीची सेवा जोडलेली आहे. होळीच्या काळात प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, वेगवान, स्वस्त व्हावा यासाठी एसटी महामंडळाने वाढीव फेऱ्या सोडण्याचे नियोजन केले आहे. प्रवाशांच्या वाढत्या गर्दीचा अचूक अंदाज घेऊन एसटी महामंडळाने होळी जादा ऑपरेशन २०२६ अंतर्गत मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या विभागांतून तब्बल १९८ जादा फेऱ्या चालवण्याची घोषणा केली आहे.

लालपरी २७ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत कोकणाच्या दिशेने अधिक वेगाने धावणार असून, होळीनिमित्त हजारो प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, सुलभ व्हावा यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या विशेष मोहिमेत सर्वाधिक फेऱ्यांचे नियोजन ठाणे आणि मुंबई विभागांतून करण्यात आले आहे. ठाणे विभागातून तब्बल ७९ फेऱ्या नियोजित असून, त्यापैकी ७१ फेऱ्या आगाऊ आरक्षणामुळे आधीच पूर्ण क्षमतेने सज्ज झाल्या आहेत. मुंबई विभागातून ६२ फेऱ्या नियोजित असून, ३७ फेऱ्यांचे आरक्षण झाले आहे. तर २५ फेऱ्या गट आरक्षणासाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पालघर विभागातून २४ फेऱ्या पूर्णपणे गट आरक्षणाच्या माध्यमातून चालवण्यात येणार आहेत. रायगड विभागातून ३३ फेऱ्या होणार असून, त्या सर्व आरक्षित प्रवाशांसाठी उपलब्ध आहेत. या विशेष मोहिमेतील सर्वाधिक गर्दी २८ फेब्रुवारी आणि १ मार्च या दोन दिवशी अपेक्षित आहे. २८ फेब्रुवारी रोजी तब्बल ९१ फेऱ्या, तर १ मार्च रोजी ५९ फेऱ्या नियोजित केल्या आहेत. होळीच्या पूर्वसंध्येला एसटी प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे.


### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**
**तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil khalapur३@gmail.com

क्र.जन्म/रजि/एसआर ५८/२०२६/९०८

१) श्री. रविंद्र चंद्रकांत मोरे
रा. शिळफाटा खोपोली, डि सी नगर घर नं.१९४,
ता. खालापुर, जि. रायगड — वादी

विरुद्ध

१) निबंधक, जन्म - मृत्यु नोदणी अधिकारी,
मुख्याधिकारी खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

विषयः- जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. रविंद्र चंद्रकांत मोरे, रा. शिळफाटा खोपोली, डि सी नगर घर नं. १९४, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी आजोबा कै. गजानन बाळशेट मोरे यांचा मृत्यू दिनांक ०२/०५/१९७५ रोजी शिळफाटा खोपोली, डि सी नगर घर नं. १९४, ता. खालापुर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.१७/०२/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण:- खालापूर
दिनांक:- १७/०२/२०२६

सही/-
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार खालापूर**


# तिसऱ्या मुंबईच्या भूसंपादनाला विरोध

**। उरण । प्रतिनिधी ।**

राज्य मंत्रिमंडळाने तिसऱ्या मुंबईसाठी जमीन संपादनाचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर एमएमआरडीए केएसपी नवनगरविरोधी समितीची बैठक पार पडली. या बैठकीत १० फेब्रुवारी रोजी राज्य मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय एकतर्फी असल्याचे सांगत त्याला समितीच्या वतीने प्रखरपणे विरोध केला जाईल असा निर्धार करण्यात आला. कोप्रोलीमध्ये पार पडलेल्या या बैठकीला अनेक शेतकरी कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्य मंत्रिमंडळाने तिसऱ्या मुंबईसाठी साडेबावीस टक्केचे तत्त्व अवलंबून जमीन संपादनाचा निर्णय घेतला आहे, त्यास प्रखरपणे विरोध केला जाईल. यासाठी बाधित सर्व ग्रामपंचायती या निर्णयाच्या विरोधात ठराव पारित करून शासनाकडे पाठविणार आहेत, असे ठरविण्यात आले. तसेच नुकत्याच झालेल्या रायगड जिल्हा परिषद व उरण पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्यांनी या भूसंपादन विरोधाचे निवेदन सरकारला सादर करावे, अशी मागणी करण्यात आली.

सरकारच्या या निर्णयामुळे जमिनीसोबत येथील स्थानिक भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांची घरे, गावे उद्ध्वस्त होतील. त्यास अनुसरून येत्या तीन-चार दिवसांत प्रत्येक गावात किमान एक-दोन विरोधाचे बॅनर लावणे. तर सक्तीच्या भूसंपादनाला विरोध करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री, नगरविकासमंत्री यांना निर्णयाला विरोध असण्याचे निवेदन देण्यात यावे. तसेच उरण-पनवेलमधील आमदार, खासदार, विरोधी पक्षनेते, मंत्री यांना मंत्रालयात बैठक आयोजित करण्यासाठी समितीचे निवेदन सादर करणे, असे निर्णय घेण्यात आले.

## बनावट नोटा प्रकरणी एकाला अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

उलवे पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या बामणडोंगरी गावात बनावट नोटाप्रकरणी एका संशयित आरोपीला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून ३० हजार ५०० रुपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आसारउल्ला हक नाझिम शेख असे आरोपीचे नाव असून तो ज्यूस विक्रीचा व्यवसाय करतो. त्याच्याकडून एकूण ५०० रुपयाच्या ३०,५०० रुपये किमतीच्या ६१ बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. या बनावट नोटा व्यवहारात वापरण्याच्या उद्देशाने आरोपीने स्वतःच्या ताब्यात बाळगल्या होत्या, अशी माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री.तुकाराम पदू हजारे व सौ. वजिता बाळू हजारे रा. कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे - अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ९२ | १६/ब | ०-४०-०० | ०-२४ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १८/०२/२०२६

**ॲड.तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३



### जाहीर हरकत

सर्व जनतेस सदरच्या जाहीर हरकतीने कळविण्यात येते की, आमचे अशिल सुधीर रामचंद्र पवार, रा.मु.पो. गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) | कब्जेदार |
|---|---|---|---|
| ३४/२/१ | ७-६७-६९ | ७६.७७ | मे.कल्याणी क्रिएशन प्रा.लि. तर्फे संजय जनार्दन गांधी |
| ३४/२/२ | ८-९९-५९ | ८९.९५ | मे.कल्याणी क्रिएशन प्रा.लि. तर्फे संजय जनार्दन गांधी |
| ३४/२/३ | ९-१२-१५ | ९१.२१ | जान्हवी सुनदिप जगासीया सुनदिप आनंद जगासीया |
| ३४/२/४ | २-२२-५७ | २२.२५ | शशिकांत संभाजी जैतापकर धर्मेंद्र संभाजी जैतापकर सीमा सत्यवान दांडेकर |

वर नमुद मिळकतींचा मुळ सर्व्हे नं.१८५ असा आहे. सदर मिळकती मुळ रामचंद्र रघुनाथ पवार यांच्या मालकीच्या मिळकती आहेत. रामचंद्र रघुनाथ पवार हे आमच्या अशिलांचे वडील आहेत. मौजे गोंधळपाडा येथील स.नं.१८५ या मिळकतीमध्ये बेकायदेशीर रित्या संभाजी देऊ जैतापकर यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती.

वर नमुद मिळकती आमच्या अशिलांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मिळकती आहेत. सदर मिळकतीच्या सातबारा सदरी वरील नोंद केल्याप्रमाणे कब्जेदार यांचे नाव सातबारा सदरी असल्याचा गैरफायदा घेऊन वर नमुद मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तिचा हक्क निर्माण करु पहात आहेत.

वर नमुद मिळकतींबाबत आमचे अशिल दिवाणी व महसुल न्यायालयात दावा/अर्ज दाखल करणार आहेत. त्यामुळे वर नमुद मिळकतीबाबत कोणीही व्यक्तीने, कंपनीने अथवा भागीदारी संस्थेने खरेदीचा करु नये. सदर मिळकतीबाबत कोणीही व्यवहार केल्यास माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरच्या व्यवहाराविरुद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. .०२.२०२६

**ॲड.प्राची गंगाराम पाटील**
रा. ताज हॉटेल जवळ,
जुन्या मराठी शाळेच्या मागे,
गोंधळपाडा, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९६२३२६०८९५



दिनांक :१८ फेब्रुवारी २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| उमंग रसीकलाल शाह | ६१ | १/१ | ०-४०-०० | ० | ३६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१८/०२/२०२६


पान १ वरून

## दिवसा काम बंद

छोटी वाटू शकते, परंतु विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. प्रशासनाने तातडीने कृती न केल्यास नाईलाजास्तव शाळेसमोर रस्त्यावर बैठक मारावी लागेल, असा सज्जड इशारा अमर वार्डे यांनी निवेदनात दिला आहे. प्रशासकीय हालचाली आणि तातडीचा निर्णय या निवेदनाची दखल घेत सामाजिक कार्यकत संजय गंगाराम सावंत यांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी (रायगड संदेश शिर्के यांची भेट घेतली.

**प्रशासनावर अंमलबजावणीची जबाबदारी**

या प्रकरणानंतर रायगड जिल्हा प्रशासनावर काम ांची सातत्याने पाहणी करण्याची जबाबदारी वाढली आहे. स्थानिक नागरिक आणि पालकांनीही प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले असले तरी भविष्यात अशा नियोजनशून्य कामांमुळे विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## नेरळमध्ये भीषण अपघात

असलेली महिला थोडक्यात बचावले असून त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार ह्युंदाई अल्काझार ही गाडी नेरळकडून कळंबच्या दिशेने जात होती. प्रवासादरम्यान चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. ताबा सुटलेली ही गाडी डाव्या बाजूने थेट उजव्या बाजूला गेली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडाला जोरात धडकली. धडक इतकी जबरदस्त होती की गाडीच्या इंजिनचा भाग पूर्णपणे दबला गेला होता आणि त्यामुळे वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

दरम्यान हा अपघात घडला, तेव्हा गाडीचा वेग जास्त असल्याने मोठा अनर्थ ओढवला असता, मात्र गाडीच्या एअरबॅग्स तात्काळ उघडल्या गेल्या. यामुळे गाडीतील चालक आणि सोबत असलेल्या महिलेला गंभीर दुखापत झाली नाही. केवळ किरकोळ जखम ांवर दोघेही बचावले आहेत. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. तसेच रस्त्याच्या मध्यभागी असलेली गाडी स्थानिक वाहन चालक यांच्या सहाय्याने बाजूला काढण्यात आली. जखमी चालक आणि महिलेला तातडीने कळंब येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे. या अपघातामुळे नेरळ–कळंब रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-26/25-26 **RFX 7000038641 ...3rd call** | Supply of L-shape Table, File Rack, Midback Wheel chair and chairs without wheels required at various locations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 4,13,775.39 |

EMD 1 % of estimated cost. Tender Fee: **Rs. 500/- + GST.** Submission of bids from **17.02.2026 to 27.02.2026 up to 11:00 hrs, Opening date: 27.02.2026 @ 11:30 Hrs.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm),
Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खार पेढांबे, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री.सुभाषचंद्र एकनाथ पाटील यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | खार पेढांबे | ८३/१ | ०-६७-१० | ७.३८ |
| | | | पो. ख. ०-०२-७० | |
| | | | ०-६९-८० | |
| २) | खार पेढांबे | ८३/२ | ०-२६-५० | ३.६९ |
| | | | पो. ख. ०-००-८० | |
| | | | ०-२७-३० | |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास वर नमुद मिळकतील विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांचा आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १८/०२/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## निवडक

## रामदास कोळी यांचा 'सर्वोच्च' सन्मान

**पाली/बेणसे :** जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट आणि इतर औद्योगिक प्रकल्पांच्या विस्तारामुळे उरणमधील स्थानिक मच्छीमारांच्या उपजीविकेवर गदा आली होती. या अन्यायाविरोधात ज्येष्ठ मच्छीमार रामदास कोळी आणि पारंपारिक मच्छीमार बचाव कृती समितीने पुकारलेल्या ११ वर्षांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढ्याला मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या या संघर्षाची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून, रामदास कोळी यांना दिल्लीत प्रतिष्ठेच्या 'फाईट फॉर जस्टिस' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. उरण तालुक्यातील उरण, कोळीवाडा, शेवा, गव्हाण आणि बेलपाडा या गावांतील मच्छीमारांचे जीवन जेएनपीटीच्या विस्तारामुळे उद्ध्वस्त झाले होते. रामदास कोळी आणि पारंपारिक मच्छीमार बचाव कृती समितीने नॅशनल ग्रीन ट्रिब्युनलमध्ये याचिका दाखल केली होती. यावर निर्णय देताना लवादाने जेएनपीटी आणि संबंधित कंपन्यांवर कडक ताशेरे ओढले आहेत. त्यांनी नष्ट केलेल्या कांदळवनांचे त्वरित पुनर्रोपण करावे. न्हावा-शेवा खाडीतील नैसर्गिक प्रवाहातील मातीचे भराव आणि कृत्रिम अडथळे तातडीने हटवावे. सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय कोणताही नवीन भराव करू नये. आणि बाधित मच्छीमारांना प्रत्येकी ५.४० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.





## पीएनपी शाळेचे उल्लेखनीय यश

**अलिबाग :** तालुक्यातील नागाव येथील पीएनपी सायरस पूनावाला शाळेने स्पेल बी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवून संस्थेची मान उंचावली आहे. स्पेल बी स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती, शुद्धलेखनाची अचूकता आणि एकूण भाषिक कौशल्ये वाढवणे हा आहे. लेव्हल १ आणि लेव्हल २ मध्ये यशस्वीपणे पात्र ठरल्यानंतर, विद्यार्थ्यांची आता लेव्हल ३ परीक्षेसाठी निवड झाली आहे. उत्कृष्ट कामगिरीमुळे आराध्या आंबुलकर (९० टक्के), नव्या गुप्ता (८४ टक्के), रेयांश नाईक (७८ टक्के), प्रिशा राऊत (६८ टक्के), वेन्सी गण (६४ टक्के), चरण हरे (६२ टक्के) आणि जसवी पेरेकर (६० टक्के) हे विद्यार्थी लेव्हल ३ साठी पात्र ठरले आहेत. शालेय व्यवस्थापन, मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंदांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांचे, शिस्तीचे व मेहनतीचे कौतुक केले. इंग्रजी शिक्षकांना त्यांच्या सततच्या मार्गदर्शनाबद्दल आणि पद्धतशीर तयारीबद्दल विशेष कौतुक करण्यात आले.

## रेयान इंटरनॅशनल स्कूलची वेळ बदलली

**पनवेल :** दहावी व बारावीच्या बोर्ड परिक्षांच्या पार्श्वभुमीवर खांदा कॉलनी सेक्टर ११ येथील रेयान इंटरनॅशनल स्कूलमध्ये पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा सकाळी ६ वाजता भरण्याचा निर्णय अखेर मागे घेण्यात आला आहे. मात्र, इतक्या पहाटे लहान मुलांना शाळेत बोलावणे अमानवी व अव्यवहार्य असल्याचा संताप पालकांनी व्यक्त केला. झोपेअभावी विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होण्याची भीतीही पालकांनी मांडली. या पार्श्वभूमीवर परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी पुढाकार घेत पनवेल तालुका गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीची तात्काळ दखल घेत गटशिक्षण अधिकाऱ्यांनी शाळेला भेट देऊन व्यवस्थापनाकडे जाब विचारला. सादर करण्यात आलेले अधिकृत सर्कुलर पाहिल्यानंतर व्यवस्थापनाने भूमिका बदलत निर्णयात सुधारणा केली. त्यानुसार १८ फेब्रुवारी पासून शाळेची वेळ सकाळी ७.०० ते ९.१० अशी निश्चित करण्यात आली आहे.



# सरकारी कार्यालयाला भाड्याच्या जागेचा आधार

## ॥ नेरळ येथील दुय्यम निबंधक कार्यालय गल्लीत ॥ सर्वसामान्य जनतेची मोठी गैरसोय






**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात जमिनीची खरेदी विक्री करण्याचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्यामुळे कर्जत येथे असलेले दुय्यम निबंधकांचे दुसरे कार्यालय नेरळ येथे सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयात महत्वाचे आर्थिक व्यवहार होत असतात. परंतु, आठ वर्षांचा कालावधी लोटला तरी या कार्यालयाला सरकारी जागा मिळालेली नाही. त्यामुळे या सरकारी कार्यालयाला भाड्याच्या जागेचा आधार घ्यावा लागत आहे. दरम्यान, एका भाड्याच्या जागेतून दुसऱ्या भाड्याच्या जागेत हे कार्यालय हलवले असून पूर्वी रस्त्याच्या अगदी बाजूला असलेले कार्यालय आता आडबाजूला नेण्यात आले आहे. येथील दुय्यम निबंधकांच्या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य जनतेची मोठी गैरसोय होणार असल्याची चर्चा नेरळकरांमध्ये आहे.

कर्जत तालुक्यातील जमिनीच्या खरेदी विक्रीचे पेव मागील २५ वर्षांत कायम आहेत. आता उरल्या सुरल्या जमिनींची विक्री व्यवहार जोरात सुरू आहेत. त्यामुळे कर्जत दुय्यम निबंधक कार्यालयाला तालुक्यात दोन कार्यालये बनवावी लागली आहेत. त्यातील नेरळ येथील कार्यालयात परवानगी नसलेल्या भूखंडांचे व्यवहार होत असतात. त्यामुळे नेरळ येथील दुय्यम निबंधक कार्यालय सतत गजबजलेले असते. हे कार्यालय गेले काही वर्षे कर्जत-कल्याण राज्यमार्गाच्या अगदी बाजूला सन्मान हॉटेल मधील पहिल्या मजल्यावर भाड्याच्या जागेत सुरू होते. नेरळ गावात महसूल विभागाचे अनेक भूखंड असून तेथे आर्थिक व्यवहार होणारे कायम स्वरूपी जागेत कार्यालय असायला हवे होते. मात्र, गेल्या सात-आठ वर्षात कार्यालय कायमस्वरूपी सरकारी जागेत ठेवण्याची कोणतीही तसदी दुय्यम निबंधक म्हणून येणाऱ्या अधिकारी वर्गाने दाखवली नाही. पूर्वीच्या कार्यालयाच्या काही अंतरावर नेरळ ग्रामपंचायत कार्यालय आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध आहे. मात्र, येथे देखील सरकारी जागेत कार्यालय हलवले गेले नाही.तर, नेरळ विकास संकुल प्राधिकरणाचे तीन मजल्याचे व्यापारी संकुल आहे. तेथे प्राधिकरण तांत्रिक अधिकारी यांचे कार्यालय आहे. मात्र, दुय्यम निबंधक कार्यालय मात्र भाड्याच्या जागेत का? हा प्रकार कोणालाही समजू शकला नाही. त्यानंतर सन्मान हॉटेलमध्ये हे कार्यालय अनेक वर्षे सुरू होते. त्या कार्यालयाच्या तळमजल्यावर मद्य विक्रीचा व्यवसाय असताना देखील त्याठिकाणी सह निबंधक कार्यालय सुरू असल्याचे आश्चर्य व्यक्त होत होते.

त्यानंतर आता या दुय्यम निबंधक कार्यालयाचे स्थलांतरण नवीन जागेत करण्यात आले आहे. मात्र, ही नवीन जागा देखील भाड्याची असून हे ठिकाण अनेकांना गैरसोयीचे ठरणार आहे. हे कार्यालय मुख्य रस्त्यावरून आडबाजूला नेण्यात आले असून पत्ता शोधताना सर्वसामान्य लोकांना मोठी कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे दुय्यम निबंधक अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य जनतेची मोठी गैरसोय होणार असल्याची चर्चा नेरळकरांमध्ये होत आहे. तसेच, दुय्यम निबंधक कार्यालयात होणारे आर्थिक व्यवहार लक्षात घेता ते कार्यालय सुरक्षित ठिकाणी आणि सरकारी जागेत असणे आवश्यक असते; परंतु, नेरळचे दुय्यम निबंधक कार्यालय हे सरकारी अधिकाऱ्यांना खासगी मालमत्ता वाटते काय? असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे.

### अधिकाऱ्यांची टाळाटाळ

नेरळचे दुय्यम निबंधक कार्यालय हे आर्थिक व्यवहार करणारे कार्यालय असल्याने ते आडबाजूला गेल्याने लोकांची गैरसोय होणार आहे. यावर कृषीवलच्या प्रतिनिधीने संबंधित अधिकाऱ्यांना काही प्रश्न विचारले. मात्र त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी उत्तर न देता आपली जबाबदारी टाळण्याचे काम करताना दिसत आहेत. तसेच, आपले म्हणणे कॅमेरे समोर मांडण्याबाबत विचारले असता, कॅमेरासमोर प्रतिक्रिया देण्याचा आपल्याला अधिकार नसून याबाबत वरिष्ठ अधिकारी प्रतिक्रया देतील, असे उत्तर त्यांच्याकडून देण्यात आले.

> आम्हाला सरकारच्या गाईड लाईन्स आल्या आहेत. त्यानुसार जुन्या इमारतीमध्ये भाड्याने कार्यालय घेतले असल्यास त्याचे भाडे संबंधित इमारत जशी जुनी होईल तसे भाडे कमी व्हायला हवे, अशा सूचना आहेत.जुन्या ठिकाणी भाडे हे ३३ हजार प्रति महिना होते. तर, नवीन ठिकाणी घेतलेल्या जागेचे भाडे २४ हजार एवढे असणार आहे. आम्ही शासनाची जमीन शोधत असून जागा सापडल्यास सरकारी जागेत कार्यालय उभे करण्याचा प्रयत्न राहणार आहे.
>
> – व्हि. जी. आंब्रजकर, दुय्यम निबंधक

## भांडणाच्या रागातून जीवघेणा हल्ला

**पनवेल :** विंधणे परिसरातील कोनार्क हेवन सोसायटीमध्ये जुन्या भांडणाचा राग मनात धरून दोन तरुणांनी सुनील मोहिते (५१) व समीर मोहिते (२३) या पिता-पुत्रावर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आल्यावर पोलिसांनी शाकीर शब्बीर खान (२४) आणि सिद्धांत प्रवीण मोरे (२३) या दोघांना अटक केली आहे.

## मायणी कोयना शाळेचा अभिनव उपक्रम

**| खरोशी | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील गागोदे केंद्रातील मायणी कोयना शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांसाठी एक नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. ए.आय. तंत्रज्ञानाच्या साह्याने विविध प्राणी थेट वर्गातच सजीव स्वरूपात दाखविण्यात आले. या अनोख्या प्रयोगामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्सुकता व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमामध्ये मोबाईलच्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून त्रिमितीय (३डी) स्वरूपातील प्राणी विद्यार्थ्यांसमोर प्रत्यक्ष उभे असल्याचा अनुभव देण्यात आला. सिंह, हत्ती, जिराफ, बदक, पेंग्विन, ससा तसेच डायनासोर यांसारख्या प्राण्यांचे आकार, हालचाली आणि वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांनी अगदी जवळून पाहिल्याने त्यांच्या आकलनशक्तीत मोठी वाढ झाली.



## मिलिंद घाडगे यांची उल्लेखनीय कामगिरी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्कर्ष' या सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेतील काव्यवाचन व वक्तृत्व स्पर्धांसाठी अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी महाविद्यालयाचे प्राचार्य मिलिंद घाडगे यांची निवड करण्यात आली होती.

महाराष्ट्रातील विद्यापीठांकडून विविध कला गुणांमध्ये पारंगत असलेले मोजके विद्यार्थी 'उत्कर्ष' या राज्यस्तरीय स्पर्धांसाठी पात्र ठरत असतात. हा राज्यस्तरीय उत्कर्ष सोहळा पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठ सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. 'उत्कर्ष'साठी विविध स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी राज्यातील अनेक दिग्गजांना परीक्षक म्हणून आमंत्रित केले होते. त्यामध्ये प्रा. मिलिंद घाडगे यांचा समावेश होता. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीसाठी पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, संचालक विक्रांत वार्डे, प्रा. डॉ. ओमकार पोटे, कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गिते, सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी प्रा. मिलिंद घाडगे यांचे अभिनंदन केले.



# पात्र शिक्षकांना परीक्षेतून सुट द्यावी

## शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या शिष्टमंडळाची मागणी



**| रायगड | प्रतिनिधी |**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या १ सप्टेंबर, २०२५ च्या न्यायप्रकरणात शिक्षकांनी दोन वर्षात टीईटी/सिटीईटी उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. असे स्पष्ट निर्देशित केलेले असताना शासनाने २ वर्षाची संधी देणे अपेक्षित आहे. मात्र, जे शिक्षक पदोन्नतीसाठी पात्र आहेत त्यांना २ वर्षाची संधी मिळणे आवश्यक आहे. परंतु, जे शिक्षक या परिक्षा उत्तीर्ण आहेत अथवा सेवेत लागण्यापूर्वी उत्तीर्ण झालेले आहेत त्यांनाच आपण संधी देत आहात. त्यामुळे पदोन्नतीस पात्र सेवा जेष्ठ शिक्षकांवरती फार मोठा अन्याय होणार आहे. या निर्णयाविरोधात राज्यातील अनेक शिक्षक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केलेली आहे. अजून त्यांचा कोणताही निर्णय लागलेला नाही. तथापि सर्वोच्च न्यायालयाने २ वर्षाची मुदत दिल्याने येत्या दोन वर्षांच्या कालावधीत किमान ६ परीक्षा होणे बाकी आहे. त्यामुळे जे पदवीधर धारक शिक्षक पदोन्नतीसाठी पात्र आहेत, अशा शिक्षकांना केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात यावी. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या शिष्टमंडळाने शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण संचालक शरद गोसावी यांची भेट घेतली. त्यांचरूसोबत चर्चा करण्यात आली असून त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन शिक्षण संचालकांनी दिले आहे.

## खारघरमध्ये बेकायदा बांधकामांवर कारवाई

**पनवेल :** सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागातर्फे खारघर आणि लॉजिस्टिक पार्क परिसरात अनधिकृत बांधकामांवर सिडकोने बुलडोझर फिरवला आहे. दोन दिवसांत मोठी कारवाई करून परवानगी न घेता उभारलेली दुकाने, वॉशिंग सेंटर, ढाबा, कंटेनर कार्यालये आणि शेड्स पाडण्यात आली. खारघरमधील सेक्टर ३५ आय, ३५ डी आणि ३५ ई भागात कारवाई झाली. येथे बांबू शेडमध्ये सुरू असलेली एकूण १९ व्यावसायिक दुकाने आणि एक वॉशिंग सेंटर हटविण्यात आले. कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव असलेल्या भूखंडावर उभारलेला ढाबाही पाडण्यात आला. तसेच, फुटपाथवर सुरू असलेली दुकानेही हटवण्यात आली. ही सर्व बांधकामे सिडकोची परवानगी न घेता उभारण्यात आली होती.




कविसंमेलन उत्साहात | विद्यार्थी कवी, कवयित्रींचे सादरीकरण

# रेगे स्मृतिदिनी 'छांदसी' काव्यरसाची वृष्टी



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात मंगळवारी (दि.१७) मराठीतील श्रेष्ठ कवी पु.शि. रेगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थी कवी व कवयित्रींच्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेच्या सहकार्याने, मराठी विभाग व ग्रंथालय विभागाच्या संयुक्तपणे भरविलेल्या या कविसंमेलनाला 'छांदसी' हे नाव देण्यात आले होते. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यात ग्रंथालय विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. गजानन चव्हाण यांनी 'छांदसी' हे शीर्षक निवडण्यामागील औचित्य स्पष्ट केले. त्यांनी पु.शि. रेगे यांचा 'छांदसी' हा समीक्षा-लेखसंग्रह मराठी साहित्यातील महत्त्वाचा ग्रंथ असून त्यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत या काव्यसंमेलनाला तेच नाव देण्यात आल्याची माहिती दिली. रेगे यांच्या काव्यदृष्टि व समीक्षेच्या परंपरेत त्यांचे मोलाचे योगदान विद्यार्थ्यांसमोर त्यांनी प्रभावीपणे उलगडले. या कविसंमेलनात काव्यवाचक म्हणून गजानन म्हात्रे, राम म्हात्रे, अपेक्षा गोसावी आणि शिवप्रसाद पंडित यांनी विविध विषयांवरील रचना सादर केल्या. विद्यार्थी कवयित्रींमध्ये समिधा रेवसकर, माही भोईर, हर्षदा महांकाळ आणि दौलत पाटील यांनी तरुणाईची स्वप्ने, जगण्यातील संघर्ष आणि निसर्गाशी असलेले भावबंध व्यक्त करणाऱ्या कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी सर्व कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले.

विशेष निमंत्रित कवयित्री ऋतुजा म्हात्रे यांनी 'चाफा' या त्यांच्या आगामी काव्यसंग्रहातील तीन निवडक कविता सादर करताना ग्रामीण स्त्रीमन, ऋतुचक्र आणि घरगुती नात्यांतील नाजूक भावविश्व प्रभावीपणे उभे केले. कवयित्री स्वाती गोडे बांगर यांनी स्त्रीदास्य, परंपरा व आधुनिक संस्कृती यांतील ताणतणावांवर भाष्य करणाऱ्या, स्त्रीस्वातंत्र्याच्या जाणिवा अधोरेखित करणाऱ्या कविता सादर केल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील होते. त्यांनी प्रत्येक कवीच्या काव्यवाचनातील भाषा, आशय आणि लय यांतील वैशिष्ट्यांवर मार्गदर्शनपर भाष्य केले आणि शेवटी स्वतःची आगरी बोलीतील 'इवान' ही कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या हस्ते सर्व निमंत्रित मान्यवरांचा स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. राम गोसावी, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. बळीराम पवार आणि मराठी विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती लाभली.



# .. आणि अधिकाऱ्यांना फाशी

'चोराला सोडून संन्याशाला फाशी', अशी जुनी म्हण आहे. आता 'राजाच्या पोराला सोडून अधिकाऱ्याला फाशी', अशी म्हण रुढ व्हायला हरकत नाही.पुण्यातील बहुचर्चित मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी विकास खर्गे समितीचा अहवाल आला आहे. या समितीने चिरंजीव पार्थ अजित पवार यांना निर्दोष ठरवल्याच्या बातम्या आहेत. खालच्या स्तरावरचे दोन अधिकारी मात्र यात लटकणार असून सध्या निलंबित असलेल्या या अधिकाऱ्यांवर आता फौजदारी कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली आहे. अर्थातच, ही कारवाई खरोखरच होईल का आणि सरकार तो खटला खरेच प्रामाणिकपणे लढवेल का हा पुढचा मुद्दा आहे. तूर्तास भ्रष्टाचाराबाबत सरकारने कारवाई केलेली आहे असे उत्तर जनतेच्या तोंडावर फेकता येईल इतपत व्यवस्था झाली आहे. संबंधित अधिकाऱ्यांना योग्य पातळीवर योग्य टप्प्यात संरक्षण दिले जाईल व पुढेमागे तेही निर्दोष सुटतील अशीच शक्यता आहे. महाराष्ट्राने भ्रष्टाचाराच्या अनेक कहाण्या आजवर पाहिल्या आहेत. पण त्यातली सर्वात सुरस कहाणी पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळ्याच्या निमित्ताने पाहायला मिळाली. आणि आता त्या प्रकरणाचा चौकशी समितीने लावलेला अर्थ हा त्या भ्रष्टाचाराहूनही सुरस आहे. मुंढव्यातील ही जमीन मुळात महार वतनाची होती. मात्र ती १९७० च्या दशकात केंद्र सरकारने ताब्यात घेतली होती. त्यानंतर ती बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थेला भाडेपट्ट्याने देण्यात आली असून तो पट्टा २०३८ पर्यंतसाठीचा आहे. असे असतानाही मूळ जमीन महार वतनाची असल्याचा फायदा घेण्याचे काही कारस्थानी लोकांनी ठरवले. त्यानुसार शीतल तेजवानी नावाच्या एका भानगडबाज बाईने मूळ महार वतनमालकांना थोडे पैसे देऊन त्यांच्याकडून मुखत्यारपत्र मिळवल्याचे दाखवले. त्याच मुखत्यारपत्राच्या आधारे ही जमीन पार्थ पवार यांच्या अमिडिया या कंपनीला विकण्याचा घाट घालण्यात आला. सर्वात कहर म्हणजे यामध्ये पैशांची देवघेव झालेली नसूनही खरेदीखत मात्र करण्यात आले व ते नोंदवण्यातही आले. चार महिन्यांपूर्वी हा व्यवहार उघडकीस आला तेव्हा अजित पवारांनी आपल्याला त्याची काही कल्पनाच नव्हती असा पवित्रा घेतला व नंतर तो रद्द झाल्याचे जाहीर करून मुलाची सुटका करण्याचा प्रयत्न केला.

### जनतेच्या डोळ्यात धूळफेक

मात्र हे प्रकरण इतक्यातच संपणारे नव्हते. १८०० कोटींची जमीन ३०० कोटी रुपयांना खरेदी करायची, ते ३०० कोटी रुपयेही प्रत्यक्षात द्यायचेच नाहीत असे करून पार्थ यांची कंपनी थांबली नाही. या करारावरचे मुद्रांक शुल्कही बुडवण्याचे त्यांनी ठरवले. त्यासाठी ही जमीन डेटा सेंटरसाठी वापरली जाणार असल्याचे दाखवण्यात आले. सरकारच्या औद्योगिक धोरणानुसार डेटा सेंटरमधून रोजगारनिर्मिती होत असल्याने त्यांना काही सवलती आहेत. त्यात सेंटरच्या जमिनीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याची तरतूद आहे. त्यानुसार जिल्हा उद्योग केंद्राकडून खोटेच प्रमाणपत्र मिळवण्यात आले व २१ कोटी रुपये मुद्रांकशुल्क भरण्याचे टाळण्यात आले. ज्या अमिडिया कंपनीने हा व्यवहार केला तिच्यात पार्थ पवार यांची हिस्सेदारी ९९ टक्के असून सध्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या माहेरकडचा एक नातेवाईक मुलगा दिग्विजय पाटील हा दुसरा भागीदार होता. शीतल तेजवानी या दलाल बाईशी दिग्विजयने करार केला होता. या करारावर पार्थ पवार यांची सही नव्हती असे कारण देऊन खर्गे यांनी पार्थ यांना निर्दोष मानले आहे असे बातम्यांमध्ये म्हटले आहे. ते जर खरे असेल तर या सुरस कहाणीचे आणखीही अनेक अध्याय येणे बाकी आहे असे म्हणावे लागेल. ३०० कोटींच्या जमीन खरेदीचा व्यवहार ९९ टक्क्यांची भागीदारी असलेल्या पार्थ यांच्या माहिती वा संमतीशिवाय झाले असे मानणे हा खर्गे समितीचा जबरदस्त षटकार म्हणावा लागेल. शीतल तेजवानीने बनावट कागदपत्र तसेच खोटी देखावा निर्माण केला हे उघड आहे. तिच्याविरुध्द यापूर्वीही फसवणुकीचे खटले झाले आहेत व ती प्रकरणे चालू आहेत. पण पार्थ यांना या व्यवहाराची माहिती नव्हती किंवा यातील भानगडीचा संशय आला नाही यावर शेंबड्या पोराचाही विश्वास बसणार नाही. तरीही फडणवीस सरकार खर्गे समितीच्या नावाने ही धूळफेक करू पाहते आहे याचा निषेध करावा तितका कमी आहे.

### भ्रष्टाचार निवाड्याचा नवा पॅटर्न

खर्गे समितीच्या अहवालामुळे फडणवीसांचे दोन हेतू साध्य होणार आहेत. एकीकडे जनतेच्या व भाजपच्या काही संशयी भक्तांचे समाधान केल्याचे पुण्य त्यांना लाभणार आहे. स्वतःच्याच उपमुख्यमंत्र्याच्या मुलाचीही चौकशी आम्ही करतो असे त्यांना सांगता येऊ शकणार आहे. जरी की, पार्थला या चौकशी समितीपुढे बोलावण्यातच आले नव्हते आणि पोलिसांनी या प्रकरणात दाखल केलेल्या तक्रारीत पार्थचे नाव नसल्याने तो त्यांच्या चौकशीच्याही बाहेरच राहणार आहे. दुसरीकडे या निमित्ताने पार्थ, सुनेत्राताई व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यावर दबाव ठेवण्यासाठी यापुढे कायमच या प्रकरणाचा वापर करता येणार आहे. एकीकडे मी तुम्हाला शिक्षेतून वाचवले आहे असे सांगून त्यांना उपकाराच्या ओझ्याखाली ठेवायचे आणि दुसरीकडे हे प्रकरण पुन्हा कधीही सुरू करता येईल अशा टप्प्यात ठेवून द्यायचे, जेणेकरून राष्ट्रवादी काँग्रेस ही कायम भाजपच्या कळपात आश्रित म्हणून राहील व वावरेल. याच वेळी जनतेमध्ये राष्ट्रवादीची अधिकाधिक बदनामी होऊन तो पक्ष अधिकच खच्ची होत जाईल हाही एक फायदा आहेच. दुर्दैव असे की, एकेकाळी इतरांपेक्षा वेगळा पक्ष असे बिरुद लावणाऱ्या भाजपचे सत्ताधीश आता गंभीरातल्या गंभीर भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा उपयोग देखील राजकारणासाठी कसा होईल इतकेच पाहू लागले आहेत. भ्रष्टाचार नष्ट व्हावा किंवा भ्रष्टाचाऱ्यांना शिक्षा व्हावी यात भाजपला रस उरलेला नाही. त्या निमित्ताने विरोधक आणि मित्र दोघेही खच्ची कसे होतील व आपली म्हणजे भाजपची सत्ता कशी बळकट होईल एवढ्या एकाच विचाराने मोदी ते फडणवीस सर्वजण पछाडलेले आहेत. जनता एकामागोमाग एक उघड्या डोळ्याने हे सर्व प्रकार पाहते आहे व शांतपणे सर्व सहन करीत आहे. खर्गे समितीच्या अहवालाबाबत गेल्या आठवड्यापासून हिंदुस्तान टाईम्स, इंडियन एक्स्प्रेस इत्यादींनी बातम्या दिल्या आहेत. पण सरकारने त्याबाबत मौन बाळगलेले आहे. टिपू सुलतानवरून मुख्यमंत्र्यांपासून गल्लीबोळातले भाजपवाले त्वेषाने बोलत आहेत. त्यातून हिंदू विरुध्द मुस्लिम असा संघर्ष भडकेल याची चिंता त्यांना नाही. उलट असा भडका उडावा आणि सरकारला गैरसोयीचे मुद्दे त्या आगीत जळून जावेत यासाठीच हे सर्व आहे चालले आहे की काय असाच संशय कोणालाही येईल. खर्गे समितीचा अहवाल खरोखरच पार्थ यांना निर्दोष ठरवणारा असेल तर यापुढे मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांना हा राजमार्गच उपलब्ध झाल्यासारखे होईल. कोणत्याही कागदावर सही करून अडकायचे नाही आणि उद्या वेळ आलीच तर तहसिलदार किंवा उपनिबंधक किंवा त्याहूनही खालच्या अधिकाऱ्यांवर खापर फोडून मोकळे व्हायचे असे सर्वत्र सुरू होईल. आता भ्रष्टाचारावरचे असले नवेकोरे पांघरूण फेकून द्यायला जनतेनेच सरकारला भाग पाडले पाहिजे.

विचार

# ट्रंपना सुबुध्दी, निर्यातीला मिळणार गती?

**अमेरिकेने व्यापार कराराची घोषणा करताना भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवण्याचे आश्वासन दिले आणि पाचशे अब्ज डॉलरच्या वस्तू आयात करण्याचे मान्य केले असा ट्रंप यांचा दावा आहे. या करारामुळे परदेशी गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढणार असून निर्यातीलाही चालना मिळणार आहे. दक्षिण आशियातील अन्य देशांच्या तुलनेत भारताच्या निर्यातीला जास्त संधी मिळू शकणार आहे.**



सतिश बोकील

गेल्या वर्षी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अगोदर भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर १८ टक्के कर लावला. त्यानंतर भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी बंद न केल्याने आणखी २५ टक्के कर लादला. आणखी सात टक्के कर वाढवून भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवर पन्नास टक्के कर लावला. इराणमधील कंपन्यांशी व्यवहार केल्यास आणखी २५ टक्के कर लादण्याची धमकी दिली. रशियाकडून आणखी कच्चे तेल खरेदी केले, तर पाचशे टक्के कर लादू, अशी धमकी द्यायलाही त्यांनी कमी केले नाही. जगातील अनेक देश ट्रम्प यांना घाबरून अमेरिकेबरोबर व्यापार करार करत असताना भारत मात्र अमेरिकेला दाद द्यायला अजिबात तयार नव्हता. ट्रम्प वारंवार आपल्या विधानांवरुन 'यू टर्न' घेत होते. भारतातून वस्तू आयात करण्यावर टॅरिफचे गतिरोधक ट्रम्प यांनी बसवले खरे; परंतु त्याचा भारताला बसला, तसाच किंबहुना त्याहून अधिक फटका अमेरिकेला बसला. अमेरिकेमध्ये महागाई वाढायला लागली. मंदीचे संकट यायला लागले. मूठभर लाळघोटे स्तुतीपाठक वगळता अमेरिकेतील तज्ज्ञ मात्र ट्रम्प यांच्या निर्णयाच्या दुष्परिणामांची जाणीव करून देत होते. अमेरिकन जनताही ट्रम्प यांच्या विरोधात कधी नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरली होती. अमेरिकेच्या संसदेत तसेच न्यायालयातही ट्रम्प टॅरिफला विरोध व्हायला लागला होता. असे असताना भारत आणि अमेरिकेदरम्यान व्यापार करार झाला. अर्थात हा करार ट्रम्प यांच्या मनासारखा झालेला नाही. आज भारत जगाची गरज बनला आहे. जगभरातील देश भारताकडे आशेने पाहत आहेत. कदाचित याच कारणामुळे ट्रम्प यांना भारतासोबत करार करण्यास भाग पडले.

आज भारताने जागतिक स्तरावर आपली प्रतिमा बदलली आहे. आज भारत स्वतःच्या अटींवर बोलतो. भारताचा धोरणात्मक आणि निर्णायक राजकीय मुत्सद्दीपणा यामध्ये भूमिका बजावत आहे. भारताने जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह देश म्हणून आपली प्रतिमा स्थापित केली आहे. त्याच वेळी, स्वतःच्या गरजांशी तडजोड केलेली नाही. रशियाकडून तेल खरेदी करणे असो किंवा रशियाबद्दल भारताचा दृष्टिकोन; जागतिक स्तरावर एक मजबूत देश म्हणून भारताची प्रतिमा निर्माण झाली आहे. भारताने आपली राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक हितसंबंध संतुलित करताना एका प्रमुख मित्रासोबत संबंध सुधारण्यासाठी व्यावहारिक आणि निर्णायक राजनैतिक पाऊल कसे उचलले, याचे हे उत्तम उदाहरण आहे. भारतातील खरेदी शक्ती वेगाने वाढली आहे. वाढत्या उत्पन्नामुळे लक्झरी आणि आवश्यक वस्तूंच्या मागणीत झपाट्याने वाढ झाली आहे. जग भारताच्या विशाल बाजारपेठेकडे लक्ष देत आहे. जगातील कोणताही देश भारताच्या या ताकदीकडे दुर्लक्ष करू शकत नाही. भारताने अलिकडच्या काळात युरोपीय महासंघ, ब्रिटन, न्यूझीलंड आणि ओमानसारख्या देशांसोबत मुक्त व्यापार करार केले. या धोरणामुळे भारताला कोणत्याही एकाच बाजारपेठेवरील अवलंबित्वापासून मुक्त केले गेले आणि जागतिक भागीदारीमध्ये भारताची विश्वासार्हता वाढली. युरोपीय महासंघानंतर अमेरिकेसोबत करार शक्य झाला. भारताची तिसरी ताकद म्हणजे त्याची मजबूत, स्थिर आणि वाढणारी देशांतर्गत अर्थव्यवस्था. आर्थिक सर्वेक्षणानुसार भारताच्या अर्थव्यवस्थेचे मूलभूत घटक पूर्वीपेक्षा अधिक मजबूत आहेत. त्यात ऐतिहासिकदृष्ट्या कमी महागाई, मजबूत ताळेबंद आणि सार्वजनिक गुंतवणूक यांचा समावेश आहे. सर्वेक्षणात भारताची मध्यम मुदतीची वाढ क्षमता सुमारे सात टक्के असण्याचा अंदाज आहे. आर्थिक वर्ष २०२७ साठी वाढीचा दर ६.८-७.२ टक्के असेल. ही परिस्थिती भारतासाठी एक प्रमुख ताकद म्हणूनदेखील उदयास आली आहे. लोकशाही स्थिरता आणि मजबूत राजकीय नेतृत्वभारताची चौथी ताकद म्हणजे लोकशाही स्थिरता आणि मजबूत राजकीय नेतृत्व. मोदी यांनी सलग तिसऱ्या टर्मसाठी पंतप्रधान म्हणून काम केले आहे. त्यांना जागतिक स्तरावर एक मजबूत राजकारणी म्हणून ओळखले जाते. भू-राजकीय गोंधळाच्या काळात, भारताची लोकशाही प्रक्रिया, कायद्याचे राज्य आणि पंतप्रधानांच्या सक्षम नेतृत्वाने भारताची एक वेगळी प्रतिमा निर्माण करण्यास मदत केली आहे; शिवाय 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात चीनच्या प्रभावाचा सामना करण्यासाठी अमेरिका भारताला एक अविभाज्य भागीदार मानते. एक मजबूत, आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि धोरणात्मकदृष्ट्या स्वतंत्र भारत हा अमेरिकेच्या जागतिक धोरणासाठी एक नैसर्गिक आणि अत्यंत मौल्यवान मित्र आहे. भारत हा राजकीयदृष्ट्या स्थिर लोकशाही देश आहे. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारताच्या डिजिटल क्रांतीने जगाला आश्चर्यचकित केले आहे. तो एक विश्वासार्ह भागीदार आहे, शिवाय आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहोत.

युरोपीय महासंघानंतर अमेरिकेचे भारताकडे पडणारे पाऊल हा केवळ व्यापार करार नाही, तर भारताच्या बदलत्या जागतिक स्थितीचे प्रतीक आहे. भारताची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, विशाल बाजारपेठ, धोरणात्मक विचारसरणी आणि विश्वासार्ह धोरणे या सर्वांमुळे भारत जगातील पसंतीचा व्यापारी भागीदार बनला आहे. जागतिक अशांततेच्या काळात भारताने स्वतःला केवळ एक उत्तम पर्याय म्हणून सिद्ध केले नाही, तर अनेक प्रकारे एक विश्वासार्ह भागीदार म्हणूनही उदयास आला. याचा भारतीय अर्थव्यवस्थेला फायदा होईल आणि भारताच्या विकासाला गती मिळेल. अमेरिकेच्या व्यापार शुल्कातली सवलत भारतातील अनेक निर्यात-केंद्रित क्षेत्रांसाठी फायदेशीर आहे. भारतीय निर्यातदार, विशेषतः कापड, सीफूड, ऑटो ॲन्सिलरी, रसायने आणि निवडक ग्राहक कंपन्यांना लक्षणीय फायदा होण्याची अपेक्षा आहे. ट्रम्प यांच्या अचानक घोषणेमागे अनेक धोरणात्मक आणि आर्थिक कारणे आहेत. ट्रम्प स्वतःला 'जागतिक डीलमेकर' म्हणून स्थान देऊ इच्छितात. भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसोबतचा एक मोठा व्यापार करार त्यांच्यासाठी राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. युरोपीय महासंघासोबतच्या करारामुळे अमेरिकेवर स्पर्धात्मक अटींवर भारताशी वाटाघाटी करण्यासाठी दबाव वाढला आहे. त्यामुळे अमेरिकन कंपन्या मागे राहणार नाहीत याची खात्री होईल. परिणामी, भारतासोबतच्या नवीन करारामुळे अमेरिकेची निर्यात वाढेल. हा करार दोन्ही देशांमधील संबंधांसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. सध्या अमेरिका भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२४ मध्ये दोन्ही देशांमधील एकूण व्यापार अंदाजे २१२ अब्ज डॉलर्स होता. भारताने अंदाजे १३० अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तू आणि सेवा निर्यात केल्या. त्यामुळे ४५ अब्ज डॉलर्सचा व्यापार अधिशेष निर्माण झाला. याचा अर्थ असा, की भारताची आयात त्याच्या एकूण निर्यातीपेक्षा ४५ अब्ज डॉलर्स कमी होती. व्यापार करारानंतर दोन्ही देशांमधील व्यापारात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. कर आकारणीच्या दृष्टिकोनातून हा कर दर स्पर्धक देशांपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. अमेरिकेने इंडोनेशियावर १९ टक्के, व्हिएतनामवर २० टक्के, बांगलादेशवर २० टक्के तर चीनवर ३४ टक्के कर लादला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील हा करार एक मोठी कामगिरी आहे. भारतावरील शुल्क कमी झाल्यामुळे चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशची झोप उडणार आहे. अमेरिकेसोबतचा हा करार विकसनशील देशांसाठी, विशेषतः 'ग्लोबल साउथ'साठी एक मोठी कामगिरी आहे. भारत हा 'ग्लोबल साउथ'चा एक आवाज आहे. यामुळे अनेक देशांना भारताप्रमाणेच अमेरिकेशी व्यवहार करण्यासही प्रोत्साहन मिळेल. दबावापुढे झुकण्याऐवजी ते अमेरिकेशी वाटाघाटी करतील. 'ग्लोबल साउथ' ही एक भौगोलिक, आर्थिक आणि राजकीय संकल्पना आहे. ती प्रामुख्याने विकसनशील, कमी विकसित किंवा उदयोन्मुख देशांना सूचित करते. त्यात बहुतेकदा दक्षिण गोलार्धात स्थित देशांचा समावेश आहे. तथापि, ते केवळ भूगोलावर नाही, तर सामाजिक-आर्थिक स्थितीवर आधारित आहे. हे देश शोषण, गरिबी, असमानता आणि जागतिक संस्थांमध्ये कमी प्रतिनिधित्वाशी झुंजत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार आणि विकास परिषदेनुसार 'ग्लोबल साउथ'मध्ये आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन, आशिया (इस्रायल, जपान आणि दक्षिण कोरिया वगळता) आणि ओशनिया (ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वगळता) मधील बहुतेक देश समाविष्ट आहेत. प्रमुख देशांमध्ये भारत, चीन, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया, नायजेरिया, मेक्सिको, अर्जेंटिना, इजिप्त, केनिया, इथिओपिया, घाना, बांगलादेश, पाकिस्तान आणि व्हिएतनाम यांचा समावेश आहे. हे देश जगाच्या लोकसंख्येच्या अंदाजे ७५-८५ टक्के प्रतिनिधित्व करतात आणि जागतिक जीडीपीमध्ये त्यांचा वाटा वेगाने वाढत आहे. ट्रम्प यांनी ताज्या कराराचा संबंध रशिया-युक्रेन युद्धाशी जोडला आहे. भारताने रशियन तेल खरेदी करणे थांबवणे युद्ध संपण्यास मदत करेल. तथापि, भारताचे ऊर्जेच्या गरजा निश्चित करण्याचे दीर्घकालीन धोरण राष्ट्रीय हितसंबंधांवर आधारित आहे. या संदर्भात, ट्रम्प यांचा दावा सध्या एकतर्फी दिसतो.

# सोशल मीडियामुळे बालपण हरवतंय



सुयोग आंग्रे

मुलांमधील इंटरनेट-मोबाईलच्या वाढत्या व्यसनावर नियंत्रण कसे ठेवता येईल, यावर चिंता व्यक्त करताना केंद्र सरकारच्या आर्थिक सर्वेक्षणाचे मुख्य सल्लागार अनंत नागेश्वरन यांनी सखोल गोष्टी सांगितल्या आहेत. मुलांमधील वाढत्या डिजिटल व्यसनापासून मुक्त होण्यासाठी पालकांना महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल, असे त्यांनी म्हटले आहे. डिजिटल कंपन्यांनीही मुलांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम करणारा असा मजकूर काढून टाकावा. ऑस्ट्रेलिया आणि फिनलँडने १५ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी इंटरनेट वापरावर बंदी घातली आहे. फ्रान्सच्या विधानसभेत यावर एकमत झाले असून ब्रिटन, डेन्मार्क आणि ग्रीसमध्ये या विषयावर अभ्यास सुरू आहेत. आपल्या देशातही गोवा आणि आंध्र प्रदेशात सर्वेक्षण सुरू आहे, जेणेकरून लहान मुलांच्या स्मार्टफोनच्या वापरावर बंदी घालता येईल. उदाहरणार्थ, सोशल मीडियाचे मुलांवर होणारे घातक परिणाम लक्षात घेता, त्यावर बंदी घालण्यासाठी देशात आणि परदेशात जागरूकता वाढली आहे, कारण त्यांच्या अव्यवहार्य मजकुरामुळे मुलांच्या स्वभावावर, वागण्यावर, अभ्यासावर, दैनंदिन जीवनावर, आरोग्यावर आणि मानसिक विचारांवर विपरीत परिणाम होत आहेत. आपल्या सरकारनेही मुलांच्या उज्वल भविष्यासाठी इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वापरावर बंदी घालण्याचे स्पष्ट धोरण आखले पाहिजे, जेणेकरून मुलांचे तसेच त्यांच्या कुटुंबाचे भवितव्य सुरक्षित होईल आणि समाजातील वाईट गोष्टींनाही आळा बसेल. सोशल मीडिया वापरण्यासाठी वयोमर्यादा निश्चित करण्याची शिफारस आर्थिक सर्वेक्षणात करण्यात आली आहे. सर्वेक्षणानुसार, वयाच्या आधारावर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रवेश मर्यादित असावा, जेणेकरून लहान वयातच मुले डिजिटल दबाव आणि ऑनलाइन सामग्रीचे नकारात्मक परिणाम टाळू शकतील. दीर्घकाळ स्क्रीनच्या वापरामुळे निद्रानाश, चिंता आणि तणाव यांसारख्या समस्या झपाट्याने वाढत असल्याचे नोंदवले गेले आहे. ऑस्ट्रेलियाचा एक उदाहरण म्हणून उल्लेख केला गेला आहे, जिथे १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी सोशल मीडियावर कायदेशीर बंदी आहे. देशातील आरोग्य तज्ज्ञही लहान मुलांमध्ये स्क्रीन टाइम वाढण्याबाबत चेतावणी देत आहेत.

जास्त वेळ स्क्रीन पाहिल्याने मनावर तसेच लहान मुले आणि मोठ्यांच्या शरीरावर वाईट परिणाम होतो आणि त्यांना इतर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आपल्या देशातही मुलांमध्ये सोशल मीडिया आणि फोनच्या वापरावर बंदी घालणे महत्त्वाचे आहे. संसदेत सादर करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणात मुलांशी संबंधित एक महत्त्वाची गोष्ट सांगितली गेली होती की मुलांमध्ये स्क्रीन टाइम वाढत आहे. या पाहणी अहवालात मुलांमधील वाढत्या डिजिटल व्यसनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे आवाहन सरकारला करण्यात आले आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक नेहमी निषिद्ध आहे. कोणीही याचे समर्थन करणार नाही, परंतु हे केवळ मुलांनाच नाही तर सर्व वयोगटातील लोकांना लागू होते. आपण कधीही लक्ष देऊ शकता. खेळताना, शाळेत असताना किंवा प्रवास करताना मुले अजूनही मोबाईल फोन आणि टॅबपासून दूर राहतात, परंतु तरुण आणि प्रौढ लोक स्क्रीनमध्ये अधिक मग्न असतात. मोबाईल, टॅब आणि लॅपटॉप ही आता मुलांसाठी मनोरंजनाची साधने राहिलेली नसून ती गरज बनली आहेत, हे आपण विसरता कामा नये. जर त्यांना ही संसाधने दिली गेली नाहीत तर ते जीवनाच्या शर्यतीत खूप मागे राहतील आणि साधनसंपन्न वर्ग पुढे जाईल. मग ही विषमता वाढतच जाईल. दुर्गम भागातील आणि गरीब वर्गातील मुले कशी मागे राहतात हे कोरोना महामारीने स्पष्टपणे दाखवून दिले होते. सरकारने या विषयावर प्रामाणिकपणे कोणताही अभ्यास केला नाही, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की त्या दीड ते दोन वर्षांत पालकांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे अनेक मुलांचे शिक्षण मुकले, त्यामुळे ते वर्ग घेऊ शकले नाहीत. त्यांना 'ग्रेस मार्क्स' देऊन पुढच्या वर्गात पाठवण्याचा विडा सरकारांनी घेतला असेल, पण शाळेत जाण्याची आणि वर्गात बसण्याची शिस्त मोडीत निघाली, तेव्हा असंख्य मुलांची मने खचली आणि ते पुन्हा शाळेत परत येऊ शकले नाहीत. आज आपण ज्या जगात राहतो ते इंटरनेट आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर इतके अवलंबून आहे की त्याशिवाय जगण्याची कल्पनाही आपण करू शकत नाही. एआयच्या विस्तारानंतर त्यांची उपयुक्तता आणखी वाढणार आहे. अशा परिस्थितीत मुलांच्या डिजिटल व्यसनाची गय करू नये. किंबहुना, अशा शिफारशीचा अर्थ असा होतो की सरकारे या अहवालाचा हवाला देतील आणि गरीब मुलांना गोळ्या पुरविण्याची कोणतीही योजना थांबवतील. शहरे आणि सधन कुटुंबातील मुलांवर याचा कोणताही परिणाम होणार नाही, परंतु वंचित घटकातील मुले मागे राहतील. सरकारला खरोखरच देशातील मुलांच्या आरोग्याची काळजी असेल तर त्यांनी त्यांच्या पोषण आणि शिक्षणात अधिक गुंतवणूक केली पाहिजे. शिक्षणावर आपला जीडीपी किती टक्के खर्च होतो हे सांगण्याची गरज नाही. त्यामुळे डिजिटल व्यसनाला प्रोत्साहन देणे म्हणजे जबाबदारीपासून पळ काढणे होय.

लोकसंसद

## महाराष्ट्रात हिंदीत उत्तर देण्याचा अट्टाहास का?

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन सरकारी पातळीवर तसेच राजकीय पक्षांकडूनही मोठ्या उत्साहात केले जाते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर तर या कार्यक्रमांचे प्रमाण वाढले आहे. त्यात तसे वावगे काहीच नाही. भाषेचा गौरव व्हावाच. मात्र या दिनाच्या आसपासच होणाऱ्या कार्यक्रमांतून मराठी भाषेचा उदोउदो केला जातो आणि उर्वरित काळात मराठीच्या संवर्धनाकडे किती लक्ष दिले जाते, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. व्यवहारात आणि सार्वजनिक ठिकाणी मराठी भाषाच वापरली गेली पाहिजे, असा आग्रह अनेकदा मांडला जातो. पण पत्रकार परिषदांमध्ये वेगळेच चित्र दिसते. महाराष्ट्रातील प्रश्नांवर चर्चा होत असताना, काही राजकीय नेते मराठीत प्रभावीपणे बोलतात; मात्र समोरून हिंदी पत्रकारांनी प्रश्न विचारताच ते तत्काळ हिंदीत उत्तर देऊ लागतात. महाराष्ट्रात, महाराष्ट्राच्या विषयावर मराठीत उत्तर देण्यात गैर काय? याउलट दक्षिणेकडील राज्यांतील नेते राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार परिषदांमध्येही आपल्या मातृभाषेत ठामपणे बोलताना दिसतात. तमिळनाडू असो वा कर्नाटक तेथील नेते आपल्या भाषेत बोलण्यात कमीपणा मानत नाहीत. त्यामुळे त्यांचा संदेश देशभर पोहोचत नाही, असे होत नाही; उलट त्यांच्या भाषिक आत्मविश्वासाचेच दर्शन घडते. कधी कधी अर्धवट हिंदीतून व्यक्त होताना अर्थबदल होतात, विधानांचा विपर्यास होतो किंवा हास्यास्पद प्रसंगही उद्भवतात. त्याऐवजी मराठीत स्पष्टपणे बोलणे आणि आवश्यक असल्यास भाषांतराची सोय करणे अधिक सयुक्तिक ठरेल. भाषेचा गौरव केवळ दिनविशेषापुरता मर्यादित न राहता तो व्यवहारातही उतरला पाहिजे. शासन, राजकारण आणि सार्वजनिक जीवनात सातत्याने मराठीचा वापर झाला, तरच गौरव दिनाला खरा अर्थ प्राप्त होईल.

**दीपक काशिराम गुंडये, वरळी**

दिनविशेष

# थोर देशभक्त विठ्ठलभाई पटेल

थोर देशभक्त, राजकीय नेते आणि हिंदुस्थानच्या केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले भारतीय अध्यक्ष बॅ. विठ्ठलभाई पटेल यांचा जन्म आजच्याच दिवसाचा. भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. मुंबई कायदेमंडळात त्यांनी १९१६ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे, या उद्देशाने त्यांनी एक विधेयक मांडले होते. १९१९ साली त्यांनी काळा कायदा म्हणून प्रसिद्ध झालेल्या रौलट ॲक्टोबर प्रखर टीका केली. मुंबई महानगरपालिका, मुंबई विधिमंडळ व काँग्रेस अशा तीन क्षेत्रांत जरी त्यांनी कार्य केले, तरी संसदपटू म्हणूनच ते सर्वत्र प्रसिद्ध होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी विविध पातळीवर आपला सहभाग नोंदवला होता. विठ्ठलभाई जव्हेरभाई पटेल हे एक थोर देशभक्त व श्रेष्ठ संसदपटू. पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून गाजलेले विठ्ठलभाई पटेल हे सरदार वल्लभभाई पटेल यांचे वडीलबंधू होत. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८७१ रोजी खेड जिल्ह्यातील करमसद या गावी लेवा पटीदार या शेतकरी कुटुंबात झाला. आईचे नाव लाडबाई. करमसद व नडियाद येथे शालेय शिक्षण संपवून ते मॅट्रिक झाले व मुंबईस वकिलीच्या परीक्षेसाठी आले. वकिलीच्या परीक्षेत भरघोस यश मिळवून त्यांनी गोध्रा येथे वकिली सुरू केली व वल्लभभाईंच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली.

पुढे दोघेही बंधू १८९८ पासून बोरसदला वकिली करू लागले. आठ वर्षे वकिली चांगली केल्यानंतर विठ्ठलभाई १९०५ मध्ये वल्लभभाईंच्या व्ही. जे. पटेल या नावाने मिळालेल्या पारपत्रावर बॅरिस्टर होण्याकरिता इंग्लंडला गेले व बॅरिस्टर होऊन परतले (१९०८). लंडनमध्ये दादाभाई नवरोजींच्या मार्गदर्शनाखाली भारतीय प्रश्नांचा त्यांनी अभ्यास केला. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी वृत्तपत्रे, व्यासपीठ व कायदेमंडळ यांचा सम्यक उपयोग केला पाहिजे ही शिकवणूक त्यांना दादाभाईंकडून मिळाली.

मुंबईला परत आल्यावर पुन्हा वकिली सुरू केली व १९११ साली मुंबई कायदेमंडळात ते निवडून आले. त्यांनी सर्व बिनसरकारी सभासद एकत्र आणून सरकारी धोरणावर प्रभाव पाडला. १९१६ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे, या उद्देशाने त्यांनी एक विधेयक मांडले. असहकारितेच्या आंदोलनातील विधिमंडळ-बहिष्कार पटेलांना मान्य नव्हता; पण त्यांनी पक्षशिस्त पाळली. विधिमंडळाचा राजीनामा दिला व निवडणुकीला ते पुन्हा उभे राहिले नाहीत. पुढे ते स्वराज्य पक्षात गेले. १९२३ च्या नागपूर झेंडा सत्याग्रहात विठ्ठलभाई पटेल एक पुढारी होते. त्यांच्याच मुत्सद्दीपणामुळे तो सत्याग्रह यशस्वी झाला. १९२२ मध्ये ते मुंबई महानगरपालिकेमध्ये निवडून आले. त्यांच्या प्रयत्नाने शाळांतून हिंदी शिकविण्यास सुरुवात झाली. सर्व खात्यांत स्वदेशी माल घेण्याचे धोरणही त्यांच्यामुळेच स्वीकारले गेले. सत्याग्रहाच्या लढ्याच्या वेळी पटेल यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला (१९३०). २० ऑगस्ट रोजी पेशावरला केलेल्या अत्याचाराचा अहवाल देण्याकरिता जी समिती नेमली होती, तिचे ते अध्यक्ष होते; पण या अहवालावर सरकारने बंदी घातली. तो हुकूम अमान्य केला गेला व पटेलांना सहा महिने शिक्षा झाली; पण प्रकृतीच्या सबबीवर ते लवकर सुटले. मुंबई महानगरपालिका, मुंबई विधिमंडळ व काँग्रेस अशा तीन क्षेत्रांत जरी त्यांनी कार्य केले, तरी संसदपटू म्हणूनच ते सर्वत्र प्रसिद्ध होते. अस्खलित वक्तृत्व, कुशल संसदपटुत्व यांसाठी ते प्रसिद्ध होते. आपल्या पगारापैकी काही रक्कम ते महात्मा गांधींना देत. त्यांनी आपल्या संपत्तीचा विश्वस्त नेमला होता. यातूनच पुढे मुलींची एक शाळा गुजरातमध्ये काढण्यात आली. या देशभक्ताचे २२ ऑक्टोबर १९३३ रोजी निधन झाले.

# निवडक

## चामुंडा देवी मंदिराचा वर्धापन दिन



**सोगावा :** अलिबाग तालुक्यातील किहीम-बाजारपेठ येथे दि. १४, ते १६ फेब्रुवारी रोजी श्रीचामुंडा देवी विश्वस्त मंडळ किहीमतर्फे ग्रामदेवता चामुंडा देवी मंदिराचा सातवा वर्धापन दिनानिमित्ताने भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या तीन दिवसीय कार्यक्रमाच्या निमित्ताने मंदिराला आकर्षक फुलांची व विद्युत रोषणाईची सजावट करण्यात आली होती. यावेळी मंदिरामध्ये तीन दिवस पूजा, भजन, कीर्तन, नवचंडी होम आणि पूर्णाहुती, महिलांसाठी कुंकुमार्चन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी किहीम पंचक्रोशीतील सर्व स्तरातील महिला व पुरुष भाविक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंदिराच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने दर्शनासाठी येत विविध कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रीचामुंडा देवी विश्वस्त मंडळ किहीम व किहीम ग्रामस्थांनी मेहनत घेतली.

## परीक्षा केंद्रावर पालक-विद्यार्थ्यांची गर्दी



**पनवेल :** सीबीएसईच्या दहावीच्या बोर्ड परीक्षांना मंगळवारपासून सुरुवात झाली. नवीन पनवेल येथील परीक्षा केंद्रावर सकाळपासूनच विद्यार्थ्यांसह पालकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. परीक्षेसाठी वेळेआधीच विद्यार्थी केंद्रावर दाखल झाले होते. परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांची काटेकोर तपासणी करण्यात येत होती. हॉल तिकीट व ओळखपत्राची पडताळणी करूनच विद्यार्थ्यांना आत सोडण्यात येत होते. कोणतीही गैरप्रकार होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क असल्याचे चित्र दिसून आले. दरम्यान, आपल्या पाल्याचा कक्ष क्रमांक शोधण्यासाठी पालकांची धावपळ सुरू होती. विद्यार्थ्यांप्रमाणेच पालकांच्या चेहऱ्यावरही तणाव स्पष्ट दिसत होता. मात्र विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जात यश मिळवण्याचा निर्धार व्यक्त केला.



## माता रमाई जयंती उत्साहात साजरी

**तळा :** तळा शहरात माता रमाई जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तालुक्यातील महिलांकडून माता रमाई जयंती उत्सवाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंचशील विकास संस्था मुंबई आणि पंचशील महिला मंडळ तळा यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात ध्वजरोहण, बुद्ध पूजापाठ, अल्पोपहार, जाहीर सभा, सत्कार समारंभ, माता रमाईच्या जीवनावर भाषणे व प्रबोधन, भोजनदान आदी कार्यक्रम पार पडले.सायंकाळी चार वाजता बाजारपेठ ते नगरपंचायत कार्यालय अशी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत खालुबाजाच्या तालावर तालुक्यातील महिला वर्गाने ठेका धरला होता. नगरपंचायत कार्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी तालुक्यातील प्रमुख मान्यवर व पंचशील महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## त्रिशाचे बालचित्र स्पर्धेत यश

**चिरनेर :** महाराष्ट्र शासन यांच्या कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आयोजित राज्यस्तरीय बालचित्र स्पर्धेत चिरनेर येथील पी. डी. खारपाटील माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी त्रिशा म्हात्रे हिने राज्यात नेत्रदीपक यश मिळवत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. कला विश्वविद्यालय शांतिनिकेतन सांगली येथे (दि.१६) फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या ६५ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तसेच खा. विशाल पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यामुळे चिरनेर गावाच्या शिरपेचात त्रिशाच्या यशामुळे आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्रिशाच्या यशाबद्दल तिच्यावर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी आईवडीलांचे आणि शिक्षकांचे विशेष मार्गदर्शन लाभले असल्याच्या भावना त्रिशाने व्यक्त केल्या. पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पी. पी. खारपाटील, राजा खारपाटील, व्ही. ए. पाटील, मिलिंद पट्टेबहादूर, आनंद चिर्लेकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्रिशाचे कौतुक करत अभिनंदन करुन तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे- १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे १) उरण-उलवा २) पेण पोयनाड ३) माणगाव-महाड-बिरवाडी, पोलादपूर, कर्जत/खोपोली, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरुड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर (मुलगी) पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. संपर्क- ८८८८२२०२२१.
- ग्राफिक डिझाईन, सोशल मीडिया हॅंडिन साठी अनुभवी मुलगी पाहिजे. मो.९९२१०७३९६३
- "आयुर्वेद वेलनेस" डायरेक्ट सेलिंग प्रोडक्ट्च्या, मार्केटिंगसाठी सेल्समन/सेल्सगर्ल्स पाहिजेत. ॲन्ड्रॉईट मोबाईल आणि बाईक असणे आवश्यक. एरिया-अलिबाग, मुरूड, पेण, रोहा, नागोठणे, कोलाड, टिप-शिक्षणाची-वयाची अट नाही, पार्टटाईम किंवा फुलटाईम मार्केटिंग करू शकता. संपर्क- ८००७१९०३५२
- पाहिजेत-अलिबाग येथे ऑफीसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ऑफीस असिस्टंट पाहिजे. संपर्क- श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४)X-Rayसाठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# साडेचार टन प्लास्टिक पिशव्या जप्त

## ●माणगाव नगरपंचायतीची दुकानावर धाड ● कारवाईमुळे शहरात एकच खळबळ

**| माणगाव | प्रतिनिधी |**

प्लास्टिक पिशव्यांवरील शासनबंदीची कठोर अंमलबजावणी करत माणगाव नगरपंचायतीने सोमवारी दुपारी कचेरी रोड येथील पंकज जनरल स्टोअर्स या दुकानावर अचानक धाड टाकून सुमारे साडेचार टन प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या. या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून छोटे मोठे उद्योग धंदेवाले भाजी विक्रेते, फळ विक्रेते, मच्छी विक्रेते, व्यापारी व विविध विक्रेत्यांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले असून एकच खळबळ उडाली आहे.

नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली.

गेल्या अनेक वर्षांपासून संबंधित दुकानातून माणगावातील छोट्या-मोठ्या दुकानदारांना, भाजी विक्रेत्यांना, मच्छी विक्रेत्यांना तसेच विविध व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा पुरवठा हा व्यापारी करीत असल्याची माहिती नगरपंचायतीला मिळाली होती. त्यानुसार नियोजनबद्ध छापा टाकून मोठा साठा जप्त करण्यात आला. शासनाने प्लास्टिक पिशव्यांवर स्पष्ट बंदी घातलेली असताना माणगावात मात्र दिवसाढवळ्या विक्री सुरू असल्याबाबत नागरिकांत तीव्र नाराजी पसरली होती.



### कचरा पर्यावरणासाठी घातक

सध्या प्लास्टिकचा कचरा सर्रास जाळला जात असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे. कचरा जाळण्याचे प्रमाण जास्त आहे. त्याशिवाय, विविध भागांमध्ये प्लॉस्टिकच्या पिशव्यांमध्ये भरुन कचरा रस्त्यांच्याकडेला, नदीपात्रात टाकण्यात येत असल्याचे चित्र पाहण्यास मिळते. प्लास्टिक कचर्याची विल्हेवाट लावण्यासाठी पेटविला जात असल्याने तो पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. तसेच प्लास्टिक जळताना होणार धुर मानवास अधिक घातक ठरत आहे.

माणगाव नगरपंचायतीने यापूर्वी वारंवार सर्व व्यापारी, दुकानदार व उद्योगधंदेवाल्यांना नोटिसा बजावून प्लास्टिक बंदीच्या सूचना तोंडी तसेच लेखी दिल्या होत्या. तरीही नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याने पत्रकारांनी वारंवार 'प्लास्टिक बंदी केवळ कागदावरच' असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध केल्या होत्या.

प्लास्टिक पिशव्यांमुळे शहरातील गटारे तुंबून मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पर्यावरणीय हानीसोबतच नागरिकांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नगरपंचायतीने केलेली ही कारवाई नागरिकांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणारी मानली जात आहे. दरम्यान, जप्त केलेल्या प्लास्टिक साठ्यावर पुढे कोणती दंडात्मक कारवाई होणार, संबंधित दुकानावर सील ठोकण्यात येणार का, किंवा कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नगरपंचायतीच्या या धडक कारवाईमुळे प्लास्टिक विक्री करणाऱ्या इतर व्यापाऱ्यांना इशारा मिळाला असून, आगामी काळात बंदीची अंमलबजावणी अधिक कडक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कर्जत उपजिल्हा रुग्णालयात गैरसोय

## || पोलीस मित्र संघटना आक्रमक || तहसीलदारांना निवेदन सादर

**| नेरळ| प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि गोरगरीब रुग्णांसाठी उपजिल्हा रुग्णालय बांधण्यात आले आहे. मात्र १५ वर्षात या रुग्णालयात सुविधांची कमतरता कायम असून पोलीस मित्र संघटनेने रुग्ण सेवाबद्दल असलेल्या गैरसोयी बद्दल आक्रमक भूमिका घेतली आहे. उपजिल्हा रुग्णालयाची उभारणी तालुक्याच्या सर्व भागातून येणाऱ्या रुग्णांना सेवा मिळावी यासाठी करण्यात आली आहे. मात्र, उपजिल्हा रुग्णालय शोभेची वास्तू वाटत आहे. रुग्णांना आरोग्य सुविधा देण्यात हे रुग्णालय कमी पडत असून प्रशासकीय यंत्रणा देखील कोणत्याही समस्यांना गांभीर्याने घेताना दिसत नाही. त्यामुळे भविष्यात या ठिकाणी अनेक सुविधा रुग्णांना मिळाव्यात यासाठी पोलीस मित्र संघटना पाठपुरावा करीत आहे. रुग्णालयातील सुविधा बाबत रमेश कदम यांनी डिसेंबर २०२५ मध्ये पत्रव्यवहार केला होता. पोलीस मित्र संघटनेचे कोकण अध्यक्ष असलेले कदम यांना प्रशासनाने त्याबाबत कोणतेही उत्तर दिले नाही.




संबंधित आरोग्य विभागाची चौकशी करावी आणि उपजिल्हा रुग्णालय संबंधित अधिकारी वर्गावर कारवाई करण्याची मागणी पोलीस मित्र संघटनेकडून कर्जत तहसीलदार धनंजय जाधव यांच्याकडे करण्यात आली.

अनेक समस्यांवर पोलीस मित्र संघटना यांच्याकडून तहसीलदारांना सूचित करण्यात आले आहे. या सर्व समस्या मार्गी लागल्या नाहीत तर काही दिवसांनी कर्जत उपजिल्हा रुग्णालय समोर उपोषण केले जाईल असा इशारा कदम यांनी दिला आहे.

# हेदवळी सावळे रस्त्याची दुरवस्था

## ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील सावळे हेदवली या रस्त्याचे बांधकाम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आले होते. या योजनेचे माध्यमातून बनलेल्या रस्त्यावर अवघ्या सहा महिन्यात खड्डे पडले असून वाहने चालवणे कठीण बनले आहे. दरम्यान, या रस्त्याची दुरुस्ती व्हावी यासाठी ग्रामस्थांनी बांधकाम खात्याला इशारा दिला आहे, अन्यथा कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा इशारा दिला आहे.

खराब रस्त्यामुळे सावळे आणि हेदवळी गावातील ग्रामस्थांना दररोज खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. या प्रवासादरम्यान खड्डे चुकवण्याच्या नादात अनेक अपघात घडत आहेत. त्यामुळे आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. गरोदर महिला आणि आजारी यांना घेऊन जाणारी वाहने ही देखील अशा खड्ड्याने धोका पत्करून प्रवास करीत आहेत. हेदवली गावालगत असलेल्या रस्त्यालगत असलेली दरी आणखी धोकादायक बनली आहे.

या रस्त्याचे अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सुरू आहेत. मात्र रस्त्याचे काम अनेक वर्षे सुरूच असून गेल्या सहा महिन्यानंतर केलेले डांबरीकरण उधळले. त्याकडे ग्रामीण विकास यंत्रणेचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पेण येथे असलेल्या संबंधित कार्यालयाचा एकही शाखा अभियंता कर्जत तालुक्यात नसतो त्यामुळे रस्त्यांची दुरवस्था झाल्यावर जाब कोणाकडे मागायचा असा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे.

त्यामुळे खराब झालेल्या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी अशी मागणी केली आहे. रस्ता पुन्हा सुस्थितीत न आणल्यास कर्जत मुरबाड रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन करण्याच इशारा ग्रामस्थांकडून देण्यात आला. रस्त्याबाबत स्थानिक ग्रामस्थ दगडू जोशी, हरिचंद्र म्हसकर, रोहिदास जोशी, सोमनाथ जोशी, नितीन भोर्डे, निलेश बोडके, मिलिंद बोडके, यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# लोकप्रतिनिधींच्या तक्रारीकडे दुर्लक्ष

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण शहरामध्ये अनेक नागरी समस्यांना सर्वसामान्य नागरीकांना सामोरे जावे लागत आहे. मग पाणी असेल, रस्ते असतील, गटारे असतील या रोजच्या समस्या आ वासून नागरीकांसमोर आहेत गेल्या साडेतीन वर्षामध्ये प्रशासकीय राजवटीमध्ये पेण शहराचा विकास मंदावलेला आहे. एक ते दिड महिन्यापूर्वी निवडणुका होऊन लोकप्रतिनिधींनी पेण शहराचा कार्यभार हाती घेतला आहे. परंतू अधिकारी वर्गाकडून लोकप्रतिनिधींनाच दूर्लक्षीत केले जात आहे. पेण नगरपालिकेमध्ये भाजपची सत्ता असली तरी देखील विरोधी पक्षाचे सात नगरसेवक आहेत. मात्र लोकप्रतिनिधींची राजवट सुरु झाली आहे याचा विसर अधिकारी वर्गाला पडली आहे. प्रभाग क्रमांक चारचे नगरसेवक भूषण कडू यांनी आपल्या प्रभागातील रस्त्यांच्या कामांबाबत २ फेब्रुवारी रोजी तक्रार करुन कामांमध्ये कशी अनियमितता आहे या बाबत सविस्तर माहिती दिली आहे. आणि प्रशासनाकडून आठ दिवसात उत्तर मिळावे म्हणून अपेक्षा देखील केली होती. परंतु चौदा दिवस उलटून ही प्रशासनाकडून नगरसेवक भूषण कडू यांच्या तक्रारीची दखल घेतलेली नाही. भूषण कडू यांनी गंभीरपणे आरोप केले आहेत की, ४ नोव्हेंबर २०२५ रोजी ज्या दिवशी नगरपालिकेची आचार संहिता लागली त्याच दिवशी कामाचे कार्यान्वित परवानगी दिली आहे तसेच घेतलेला ठराव हा केवळ औपचारिकता असून अगोदर झालेल्या कामाचाच नव्याने कार्यान्वित आदेश काढलेत. तसेच कोणत्याही ठेकेदाराला लेखी परवानगी दिलेली नाही अथवा केव्हा दिली याबाबत पूर्णताः माहिती प्रशासनाने लपविलेली आहे. असे भूषण कडू यांनी सांगितले आहे की, जर या कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहारावर प्रशासनाने योग्या तो खुलासा केला नाही तर ही बाब नगरविकास खात्यापर्यंत घेऊन जाणार आहे असे सांगितले. जर आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींना अधिकारी वर्ग दुर्लक्षीत ठेवत असतील तर सर्वसामान्य नागरिकांची अवस्था काय असेल? असा शेवटी त्यांनी सवाल केला.

## लाड कुटुबियांचा सन्मान

**म्हसळा :** म्हसळातालुक्यातील देवघर येथील स्वयंभू श्रीअमृतेश्वर शंकर मंदिराचे संपूर्ण विद्युत पुरवठा व फिटिंगचे काम नेवरूळ येथील रविंद्र लाड कुटुबियांनी स्वखर्चातून पूर्ण केले. या कार्यामुळे भाविकांना मोठी सोय उपलब्ध झाली आहे. यामध्ये रविंद्र गोविंद लाड, स्वप्नील रविंद्र लाड, सुशांत लाड, संतोष लाड यांच्या कुटुबियांच्या पुढाकारातून पूर्ण करण्यात आले असून महाशिवरात्रीच्या दिवशी सामाजिक व धार्मिक योगदान दिल्याबद्दल बद्दल लाड कुटुंबातील सर्व सदस्यांचा सन्मान करण्यात आला.

## शिवव्याख्यानाचे आयोजन

**श्रीवर्धन :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोंढेतर्फे श्रीवर्धन येथे भव्य शिवस्मारकाचे उद्घाटन सोहळा गुरुवारी, (दि.१९) रोजी होणार आहे. ग्रामस्थ मंडळ कोंढे व श्रीकाळभैरवनाथ क्रिकेट मंडळ कोंढेतर्फे श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.३० वाजता भव्य पालखी मिरवणुकीने होणार आहे. याप्रसंगी शिवव्याख्याते संदीप पाटील प्रमुख उपस्थित राहून शिवचरित्रावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आली आहे.

## संत सेवालाल यांची जयंती साजरी





**| उरण | प्रतिनिधी |**

उरण बस डेपो (आगार) येथे थोर समाज सुधारक संत सेवालाल महाराज यांची २६७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी वामनराव राठोड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत सत्कार करण्यात आला. प्रत्येक व्यक्तीने संत सेवालाल यांच्या उपदेशानुसार वागले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी डी एम बोंद्रे, रोहन खालीपे, प्रकाश चित्ते, सुनील चौधरी, संजय पाटील, दिनेश पाटील, अबू राठोड, राजेश राठोड, यू. आर. जाधव, विलास चव्हाण, पोलीस कर्मचारी, महिला वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाची रूपरेषा मयूर राठोड यांनी मांडली तर वामनराव राठोड यांनी आभार मानले.

# खोपोलीत पोलिसांचे संचलन

**| खोपोली | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त खोपोली शहरात उत्साहाचे वातावरण असताना कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षका आंचल दलाल तसेच खालापूर तालुकाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी शहरात संचलनाचे आयोजन केले होते.



संचलन खोपोली शहरातील प्रमुख मार्ग तसेच शिळफाटा परिसरात काढण्यात आला. संचलना दरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचारी गणवेशात सज्ज होते. शहरातील संवेदनशील ठिकाणांची पाहणी करण्यात आली. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी तसेच समाजात शांततेचा संदेश जावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

## सभोवतालच्या इतिहासाची मिळणार माहिती | अतिउत्साही ट्रेकर्सना भाग न घेण्याचे आवाहन

# शिवजयंतीला सरसगडावर प्रदक्षिणेचे आयोजन

**| पाली/ वाघोशी | प्रतिनिधी |**


सुधागड संघर्ष संस्थामधील तरुणांनी रायगड प्रदक्षिणा प्रमाणे सरसगड प्रदक्षिणा शिवजयंतीला गुरुवारी (दि. १९) सकाळी ६ वाजता आयोजित केली आहे. यंदाचे हे दुसरे वर्ष असून मागील वर्षी तब्बल ५२ जण या प्रदक्षिणेत सहभागी झाले होते. प्रदक्षिणेमुळे सरसगडाच्या भोवतालच्या ऐतिहासिक व नैसर्गिक परिसराची माहिती अनेकांना मिळते. मोहिमेत सहभागी होण्यासाठी अनेकजण उत्साही आहेत. प्रदक्षिणेचा मार्ग खडतर आहे.

साहसी, जबाबदार ट्रेकिंगप्रेमींनी अवघड आणि जिद्दी अशा अविस्मरणीय प्रदक्षिणेचा अनुभव जरूर घ्यायला पाहिजे.

मात्र, अतिउत्साही व नियम न पाळणाऱ्या ट्रेकर्सने भाग घेऊ नये असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. सरसगड प्रदक्षिणेसाठी रु. १०० एवढी नाममात्र नोंदणी फी आकारली आहे. नोंदणीसाठी अरविंद दंत ९२७२०७१५३४, कपिल पाटील ९२२६७८४२५५, अमित निंबाळकर ९२७३७९०८५०, प्रदीप गोळे ८०८७५६९२९२ यांच्याकडे करावा. अटी व शर्ती नोंदणी करताना दिल्या जातील असे संस्थेतर्फे सांगण्यात आले.

### ऐतिहासिक महत्त्व आणि दुर्गम रचना

प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेले पाली गाव सरसगड किल्ल्याच्या कुशीत वसलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या गडाचे महत्त्व ओळखून तो स्वराज्यात सामील केला आणि त्याच्या दुरुस्तीसाठी दोन हजार होण मंजूर केले होते. समुद्रसपाटीपासून ४९० मीटर उंचीवर असलेल्या या किल्ल्याची बांधणी दुर्गमता आणि विपूल जलसंचय यावर भर देऊन करण्यात आली आहे. दूरवर टेहळणी करण्यासाठी मसरसफ असल्याने या किल्ल्याला 'सरसगड' हे नाव मिळाले. किल्ल्याच्या दक्षिण बाजूला एकाच दगडात घडविलेल्या १११ पायऱ्या हे या गडाचे प्रमुख वैशिष्ट्य असून, गडाला 'दिंडी दरवाजा' या नावाने ओळखले जाणारे मजबूत प्रवेशद्वार आणि तटबंदीचे संरक्षण आहे.



### गडावरील वास्तू सांस्कृतिक वारसा

किल्ल्यावर बाराही महिने स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध असलेला ३ मीटर खोल 'मोती हौद' असून, बालेकिल्ल्याच्या पायथ्याशी असे एकूण दहा हौद आहेत. गडाच्या परिसरात घोड्याची पागा, धान्य कोठारे, शस्त्रागारे, कैदखाने आणि दारू कोठारे कोरलेली आहेत. बालेकिल्ल्यावर जोगेश्वरी (केदारेश्वर) मंदिर आणि शहापीर दर्गा असल्याने येथे धार्मिक सलोखा पाहायला मिळतो.

> "सरसगड प्रदक्षिणेचे हे दुसरे वर्ष असून, या मोहिमेद्वारे तरुणांना गडाचा इतिहास आणि त्याभोवतीचा नैसर्गिक ठेवा जवळून अनुभवता येईल. रायगड प्रदक्षिणेच्या धर्तीवर आयोजित ही मोहीम खडतर असली तरी, साहसी ट्रेकर्ससाठी हा एक अविस्मरणीय अनुभव ठरेल. शिवजयंतीच्या निमित्ताने ऐतिहासिक वारसा जतन करणे आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे."
>
> प्रदीप (दादू) गोळे, आयोजक, सुधागड संघर्ष संस्था.

**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/म.प्र.-१.दि.१८/१०/२०२३**

**परिशिष्ट-३**

**(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)**

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि. रायगड**

**ई-मेल :-eerid24@gmail.com दूरध्वनी क्रं. ०२१४०/२५०८५७**

**निविदा सूचना क्र.६३ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा जि. रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदादारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. | इसारा रक्कम रु. | काम पूर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रू. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये कासार्डी नदीला बंधारा क्र.१ बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे. ता.पनवेल, जि.रायगड | ९६,६३,८४०/- (जी.एस.टी स्वामित्व शुल्क व विमा धरुन) | ९६,७००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- २३६०/- (ना-परतावा) | वर्ग-४ व त्यावरील |

निविदा उपलब्ध कालावधी — दि.१८-०२-२०२६ ते दि. २५-०२-२०२६

निविदा उघडण्याचा — दि.२६-०२-२०२६

खालील संकेतस्थळ स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि. १८-१०-२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४ ई-मेल : eerid24@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखून ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

टिप :- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T.चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
**(इंजि.मिलिंद पवार)**
कार्यकारी अभियंता
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/३०८**

### जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळिवणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे बेलवली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.२९१, क्षेत्र ०.२३.०० (हे.आर.), पो. ख. ०.०२.०० (हे. आर.), एकूण क्षेत्र ०.२५.०० (हे. आर.), आकार ६.१९ (रु.पैसे) या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती शमिका शरद घरत, कु. शर्मिला शरद घरत, परेश शरद घरत, सर्व रा. बेलवली, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांजकडुन जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक - १८/०२/२०२६. **(ॲड. परेश एम. घरत )**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस.टी.
स्टँड जवळ, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड
९८५०४८१२३४

### जाहीर नोटीस

दिनांक १८/०२/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे भोईरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| क्र.११/१/ब/१ | ०-५८-०० पैकी लिहून देणार यांचे मालकी हक्काची ०-३४-०० एवढ्या क्षेत्राची संपुर्ण मिळकत | ६-०२ |

च्या शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

### जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली नमुद केलेल्या भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक १९५ या जमिन मिळकतीच्या ७/१२ सदरी गावकरी लोक झिराड पंच वसंत सखाराम गावडे, नथुराम बाळाराम पातील, रामदास पांडुरंग भोईर, रविंद्र महादेव गुरव, प्रकाश पांडुरंग ठाकुर, वसंत काशिनाथ पवार, तुकाराम अप्पा पाटील यांची नावे दाखल असून झिराड गावच्या गावकरी लोकानी सदरहू जमिन मिळकतीचे सर्व संमतीने ठराव करून प्लॉटिंग करून, सर्व ग्रामस्थांमध्ये वाटप केले आहे. सदरहू प्लॉट पैकी प्लॉट क्र.२० श्री. महेश मनोहर पेटारे, राहणार झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड यांस देण्यात आले असून, सदरहू प्लॉट क्र.२० या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| झिराड, ता.अलिबाग. | १९५ | ३-७२-०० एकूण | ३-५५ |

सदर मिळकतीची श्री. महेश मनोहर पेटारे यांच्या मालकी व ताबेकब्जा वहिवाटीत प्लॉट क्र.२०, क्षेत्र २ गुंठे

अलिबाग,
दिनांक : १७/०२/२०२६.
सही/
**(ॲड. सतिश शंकर पाटील )**
हिराबाग सोसायटी, तळमजला,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील
मो.नं. ९८८१८५७५२९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे अरवंद, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक जितेंद्र सुदाम दरे व भास्कर पदु पाटील यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|
| ५/१/अ | ००-५१-४० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी जितेंद्र दरे व भास्कर पाटील यांचे मालकीचे ००-२५-०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | २.०२ |

सबब सदर वर वर्णन केलेली बिनशेती मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- १८ फेब्रुवारी २०२६
**ॲड.शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो.नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. विशाल सुरेंद्र विज व श्रीमती सोमा विशाल विज, दोघे रा. ७०१, वेव्हलेश, पेरी क्रॉस रोड, पोलिस कमिशनर ऑफिसच्या मागे, बांद्रा (प.), मुंबई, ४०००५०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे रजपे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ५८/९ | ०.४७.०० पो.ख. ०.०५.०० | ०.३३ |
| | एकुण ०.५२.०० | |

यापैकी खरेदी देणार श्री.महेश भगवान घुडे यांच्या हिश्श्याचे ०.२१.०० हे.आर.पॉ.क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १८/०२/२०२६.
सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत,''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं.७३८५००४८०६.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### E–TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000038348** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-29/ 2025-2026.** RFx e-tender for supply of manpower with two wheeler for ground patrolling of underground cable route of 220kV Timbermart-Khandeshwar I & II line for finding of any digging/ excavation/ construction activity by various utilities and providing & fixing of mute marker at 50 meters on underground cable route of 220kV Timbermart Khandeshwar I & II line under EHV Lines S/Dn. Panvel -1 under EHV O&M Division Panvel.... **2nd call.** **Tender amount Rs. 11,41,126/-, EMD amount Rs. 11,411/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **18.02.2026, 18:00 Hrs. to 01.03.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.03.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **02.03.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**Executive Engineer**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

### पाहिजेत

ग्रुप ग्रामपंचात सारळ, कार्यलय मु.पो. सारळ ता. अलिबाग जि. रायगड करीता खालील पद भरावयाचे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | संवर्ग | जागा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी पाणीपुरवठा कर्मचारी | खुला | १ | ७ वी, प्लंबिंग येणे आवश्यक |
| २ | कचरा व्यवस्थापन करण्यासाठी कंत्राटी कर्मचारी | खुला | १ | अट नाही |
| ३ | घंटागाडी चालक | खुला | १ | तीन चाकी परवानाधारक |

वरील प्रमाणे ग्रामपंचायत सारळ कार्यालयास जागा भरावयाची आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या मुळ प्रती व झेरॉक्स सह दि. २४/०२/२०२६ मंगळवारी रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत सारळ कार्यालयात प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित रहावे.

टिप -

१. अर्जदार हा ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशी असावा.
२. स्थानिक हद्दीतील अर्ज प्राप्त न झाल्यास बाहेरील अर्जदारस प्राधान्य देण्यात येईल.
३. पाणीपुरवठा कर्मचारी यांना जल जिवन मिशन योजनेचे ग्रामपंचायत हद्दीत पाणीसोडणे, R.O. प्लॉट फुफादेवीपाडा व सारळ पाणी भरणे व जल जिवन मिशन योजनेची पाणीपट्टी वसुली करणे. सोबत प्लंबिगच कामाचा अनुभव असावा.
४. नियुक्तीचे सर्व अधिकार ग्रुप ग्रामपंचायत सारळ यांनी राखुन ठेवले आहे.

मुलाखतीचा पत्ता
ग्रुप ग्रामपंचायत सारळ
कार्यालय मु.पो. सारळ ता.अलिबाग-रायगड

**सही/-** — **सही/-**
**निशा उ. चंदनकर** — **श्री. हसराज कोकार्डे**
**ग्रामपंचायत अधिकारी** — **प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत, सारळ** — **ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ. शिल्पा राजेंद्र चौधरी, रा. विवरे, ता. रावेर, जि. जळगाव यांनी श्री. रमेश कृष्णाजी लोकरे यांच्याकडून दस्त क्र.२४९०/१९९१ रोजी खरेदीखताने सदरचा भूखंड विकत घेतला असून त्या भूखंडावर श्री सद्गुरूकृपा सहकारी गृहबांधणी संस्था, चेंढरे, ता.अलिबाग यांचे सभासद आहेत. माझ्या अशिलांनी वरील खरेदीदाराकडून सदर सभासद असल्याचे भागधारक पत्र (शेअर सर्टिफिकेट) क्र.१२ चे भाग क्रमांक ५६ ते ६० व भागधारक पत्र क्र. ३३ चे भागक्रमांक १६१ ते १६५ हे भाग दाखले हस्तांतरीत केले होते. परंतु सदरचे भागदाखले माझ्या अशिलाकडून गहाळ झाले आहेत.

तरी या संदर्भात कोणाची काही हरकत किंवा तक्रार असल्यास त्यांनी आपल्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कळवाव्यात.

अलिबाग
दि. १७/०२/२०२६
सही/-
**ॲड. मनोज बाळकृष्ण पडते**
रा.गुंजीस, पो.नवगाव,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८५०७२५२७२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राहुल वसंत म्हात्रे, रा. ६७-२, विठ्ठल मंदिर जवळ, ओवे गाव, खारघर, रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन विकसन कराराने विकसित करण्यासाठी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड, येथील बिनशेती मिळकत**

| स. नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०/४ | ३.७९.०० | ३७.९० | श्रीमती इंदिरा रघुनाथ लाड |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीच्या विकसन कराराचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १८/०२/२०२६.
सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

### जाहीर नोटीस

दिनांक : १८ फेब्रुवारी २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे-आर चौ. मीटर | रुपये | पैसे |
| सुनंदा एकनाथ पाटील, संदिप एकनाथ पाटील, मंगेश एकनाथ पाटील, माधुरी गणेश मोरे | २७ | १क | ०-९०-४० पैकी ०-२०-० | १० | २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४,
दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट,
हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका),
पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही / -
**ॲड. अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- १८/०२/२०२६
मो. नं. ९९२२३६८१२१

### जाहीर नोटीस

दिनांक : १८ फेब्रुवारी २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे-आर चौ. मीटर | रुपये | पैसे |
| उमा आनाजी पाटील, मथुरा परशुराम पाटील, अनिल परशुराम पाटील, प्रभावती सदाशिव विशे, मनिषा राजू पारठे, अश्विनी किसन कालप | २३ | १९ | ०-१४-० | ० | २५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४,
दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट,
हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका),
पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही / -
**ॲड. अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- १८/०२/२०२६
मो. नं. ९९२२३६८१२१

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे आवास, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-१२-० हे. आर एवढे क्षेत्र मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संदिप नथुराम भगत, श्री. संतोष नथुराम भगत आवास (मुगर), आवास फाटा, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| आवास ता.अलिबाग, जि.रायगड | २९४/१ | ०-१९-०० पो.ख ०-०१-५० एकूण ०-२०-५० | ३-५७ |

वर नमुद मिळकतींपैकी ०-१२-०० हे.आर क्षेत्र

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १७.०२.२०२६
सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक कार्यालय
अलिबागच्या समोर अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

### महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**

**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड**

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१ — फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८

ईमेल :- collector.raigad@maharashtra.gov.in — ईमेल :- dydeoraigad@gmail.com

क्र./निवडणूक/कार्या ६(२)/मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम/२०२६ — दि.१७/०२/२०२६

**फेर ई-निविदा सूचना क्रमांक ०१/२०२६**

मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत Enumaration Form व इतर अनुषंगिक साहित्य छपाई करणेबाबत ई निविदा सूचना

रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघात मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत Enumaration Form व इतर अनुषंगिक नमुन्यांची छपाई करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध करुन फेर ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाचे नाव :- रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत Enumaration Form व इतर अनुषंगिक नमुन्यांची छपाई करुन देणेबाबत फेर ई-निविदा.

| | |
|---|---|
| निविदा अंदाजित रक्कम | रु.३५,००,०००/- |
| ई निविदा फार्म शुल्क | रु. ५,७००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | रु. ९५,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रु. १,०५,०००/- |
| ई-निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ | रु.१७-०२-२०२६ सकाळी १०.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. १७-०२-२०२६ सकाळी १०.०० पासून ते दि.२६-०२-२०२६ सायंकाळी ०४.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (prebid Meeting)) दिनांक वेळ | दि. २३-०२-२०२६ दुपारी १२.०० वाजता |
| ई-निविदा स्वीकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि.२६-०२-२०२६ सायंकाळी ०४.०० वाजता |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि.२७-०२-२०२६ रोजी सायंकाळी ०४-०० वाजता किंवा अन्य दिवशी प्रशासकीय सोयीनुसार |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२. प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्वीकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वत: राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डिजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वत:नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमुद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
६ निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/-**
**(किशन ना. जावळे)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा**
**निवडणूक अधिकारी रायगड**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## श्रीलंकेचा नवा हिरो 'पथुम निस्सांका'

टी-२० क्रिकेट हा वृद्धांचा खेळ नाही, हे आता अलीकडे वारंवार सिद्ध होतंय. ऑस्ट्रेलियाचा संघ झिंबाब्वे विरुद्ध सामन्यात हरल्यानंतर सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला होता. ऑस्ट्रेलियन संघात रथिमहारथी खेळाडू आहेत; मात्र, त्या सर्वांची वयं वाढलेली आहेत. बरेचसे प्रमुख खेळाडू वयाची पस्तीशी पार केलेले आहेत. त्यामुळे तरुणाईची चपळता आवश्यक असणारे हे क्रिकेट ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या अंगभूत गुणवत्तेला वाव देऊ शकले नाही. यंदाच्या विश्वचषकात ही गोष्ट झिम्बाब्वे आणि श्रीलंके विरूद्ध सामन्यात अधोरेखित झाली. जायबंदी खेळाडूच्या जागी पाठवण्यात आलेला खेळाडू तरुण असावा, ही माफक अपेक्षा होती. मात्र, ऑस्ट्रेलियाने स्मितच्या स्वरूपात खेळाडू पाठवला.जो वय वाढलेला खेळाडू आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, ऑस्ट्रेलियाकडे तरुण खेळाडूंची वानवा आहे. अशातच श्रीलंकेचा तरूण खेळाडू निस्सांकाने आपल्या तडफदार खेळाने ऑस्ट्रेलियाच्या वयस्क खेळाडूंना जणू चपराकच मारली आहे.

२० षटकांच क्रिकेट हे तरुणांचे क्रिकेट आहे, हे आता मान्य करावेच लागेल.

विनायक दळवी

जगभरातील नवोदित संघ देखील तरुण खेळाडूंना संधी देत आहेत. जे आपापल्या संघांना काही नेत्रदीपक विजय मिळवून देत आहेत. ऑस्ट्रेलिया विरुद्ध सामन्यात खेळलेल्या श्रीलंकेच्या निस्सांकाचे उदाहरण घ्या. २७ वर्षांचा हा तरुण तडफदार फलंदाज, गेल्या दीड-दोन वर्षांपासून श्रीलंकेच्या क्रिकेट रसिकांची मने जिंकत आहे. त्याने कसोटी पदार्पणातच शतक झळकवले. ५० षटकांच्या एक दिवसीय क्रिकेटमध्ये पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना नाबाद २१० धावांचा नवा जागतिक विक्रम नोंदविला. श्रीलंकेच्यावतीने २० षटकांच्या क्रिकेटमध्ये द्विशतक झळकवणारा तो पहिलाच फलंदाज आहे. ८६ सामन्यांत वेगात २५०० धावा करणारा तो पहिलाच फलंदाज आहे. यावरून त्याच्या धडाकेबाज फलंदाजीची कल्पना येते. या धडाकेबाज फलंदाजीत नजाकत आहे. त्याची फलंदाजी पाहताना वाटतं, आपण भारताचा गुंडाप्पा विश्वनाथ आणि श्रीलंकेचा महेला जयवर्धने यांना एकत्रितपणे फलंदाजी करताना पाहतोय. कारण तो ताकतीचा फारसा वापर करतोय, असं वाटत नाही. गोलंदाजाचा चेंडूचा वेग कलात्मक रित्या क्षेत्ररक्षकांच्या मोकळ्या जागेत फटकावण्याची त्याची कला, तमाम क्रिकेट विश्वाने सोमवारी (दि.१६) ऑस्ट्रेलियाविरुद्ध लढतीत पाहिली. पॉईंटला दोन क्षेत्ररक्षक ठेवले असताना देखील, त्याने मारलेले स्क्वेअर कट त्याच्या चेंडूवरील हुकूमत आणि नियंत्रणाचे द्योतक होते. त्याच्या भत्त्यामध्ये ऑन साईड कडील फटक्यांचा देखील खजिना आहे. त्याचे 'पुल' चे खणखणीत फटके जेव्हा क्षेत्ररक्षकांमध्ये जाऊन पडले तेव्हा त्याच्या बॅटची ताकद आणि कलात्मकता तमाम क्रिकेट विश्वाने पाहिली. त्याच्याकडे ड्राईव्हचे देखील सुंदर फटके आहेत. त्याने मॅक्सवेलचा एक जोरकस फटका पॉईंटला सूर मारून टिपताना दाखवलेली चपळता आश्चर्यचकित करणारी होती. त्याच्या शतकाप्रमाणेच तो झेल देखील सामन्याला कलाटणी देणारा ठरला. कारण अखेरच्या ५ षटकांत ऑस्ट्रेलियन संघाला केवळ ६ धावांच्या सरासरीने अवघ्या ३० धावाच काढता आल्या. श्रीलंकन संघाच्या फलंदाजांवरील दडपण त्यामुळे निश्चितच कमी झाले. संघाचे शतक केवळ श्रीलंकन संघाला सुपर-८ मध्ये प्रवेश देणारच नव्हे, तर तमाम श्रीलंकेच्या नागरिकांना नवा विश्वास देणारा ठरला आहे.

श्रीलंकेत गॉल येथे जन्मलेला निस्सांका आर्थिकदृष्ट्या सक्षम नव्हता. त्याचे वडील सुनील सिल्वा हे ग्राउंड बॉय म्हणून काम करायचे. त्याची आई मंदिराजवळ फुले विकायची. या अडचणी असूनही, त्याला क्रिकेटची आवड निर्माण झाली. त्याने कालुतारा विद्यालयातून कारकिर्द सुरू केली आणि नंतर तो कोलंबोच्या इसिपाठाणा कॉलेजमध्ये गेला. शालेय क्रिकेटमध्ये त्याने लक्ष वेधले. राजगिरीया येथील प्रेसिडेंट्स कॉलेजविरुद्ध १९० चेंडूत नाबाद २०५ धावा केल्या. २०१७ मध्ये हंबनटोटा जिल्ह्यासाठी त्याच्या देशांतर्गत पदार्पणाने त्याच्या व्यावसायिक प्रवासाची सुरुवात झाली, जिथे लिस्ट ए क्रिकेटमध्ये त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याला २०२१ मध्ये राष्ट्रीय स्तरावर बोलावण्यात आले. त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीची सुरुवात संथ गतीने झाल्यानंतर, त्याने २०२२ मध्ये आपले स्थान मजबूत केले आणि तेव्हापासून तो श्रीलंकेच्या फलंदाजी आधारस्तंभ बनला. अलीकडेची अस्थिर राजकीय परिस्थिती आणि आर्थिक विवंचनेत सापडलेल्या या देशाला, निस्सांकाची फलंदाजी कदाचित जगण्याची नवी उमेद देऊ शकेल.

# ऑस्ट्रेलिया विरूद्ध 'निस्सांका' थरार

## ।। श्रीलंकेचा सुपर आठमध्ये प्रवेश ।। कांगारूंना पाजले पराभवाचे पाणी

। कोलंबो । वृत्तसंस्था ।

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत सोमवारी (दि.१६) श्रीलंका विरुद्ध ऑस्ट्रेलिया असा सामना पार पडला. या सामन्यात श्रीलंकेच्या पथुम निस्सांकाचा खेळ पाहायला मिळाला. त्याने एक उत्तम झेल पकडत आणि शतकी खेळी करत कांगारूंना पराभवाचे पाणी पाजले. या विजयामुळे श्रीलंकेचे सुपर आठमधील स्थान पक्के झाले असून ऑस्ट्रोलियाचे स्पर्धेतील स्थान संपुष्टात आले.







श्रीलंकेने नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या मार्श व हेड याने संघाला उत्तम सुरूवात करून दिली. परंतु, हे दोघे बाद झाल्यानंरत ऑस्ट्रेलियाचा डाव अडखळला. त्यानंतर जोश इंग्लिस आणि मॅक्सवेल यांनी संयमी खेळी करत धावफलक हलता ठेवला. ऑस्ट्रेलियाच्या १६व्या षटकात श्रीलंकेला मॅक्सवेलचा बळी घेण्याची संधी होती; मात्र, निस्सांकाने त्याचा सोपा झेल सोडला. तेव्हा ऑस्ट्रेलिया २००च्या पुढे धावा करेल, असे सर्वांना वाटत होते. मात्र, दुशन हेमंथाच्या त्या १७व्या षटकातील पहिल्या चेंडूवर मॅक्सवेलने रिव्हर्स स्वीप खेळला. निसांकाने मात्र ही संधी जाऊ दिली नाही आणि हवेत सूर मारत तो चेंडू झेलला आणि मॅक्सवेल २२ धावा करत बाद झाला. निसांकाच्या त्या झेलमुळे ऑस्ट्रेलियाचे बळी जातच राहिले. त्यामुळे ऑस्ट्रोलियाला २० षटकात सर्वबाद १८१ धावाच उभारत्या आल्या. यामध्ये कर्णधार मिचेल मार्श आणि ट्रॅविस हेड यांनी अर्धशतकी खेळी केल्या.

लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरूवात काही खास झाली नाही. सलामीवीर कुसल परेरा १ धावेवर मार्कस स्टॉयनिसच्या गोलंदाजीवर बाद झाला. परंतु, पथूम व कुसल मेंडिस याने ९७ धावांची भागीदारी करून श्रीलंकेला विजयी मार्गावर आणले. स्टॉयनिसने १३ व्या षटकात ही जोडी तोडली. मेंडिस ५१ धावांवर माघारी परतला. श्रीलंकेला अजूनही ४६ चेंडूंत ७७ धावा करायच्या होत्या आणि ८ गडी शिल्लक होते. पवन रत्नेनायकेने येताच सलग दोन चौकार खेचून श्रीलंकेवरील दडपण कमी केले. त्यानंतर निस्सांका मैदानावर उभा राहिला आणि त्याच्या ५२ चेंडूंत १० चौकार व ५ षटकारांसह नाबाद १०० धावांनी श्रीलंकेला विजय मिळवून दिला. श्रीलंकेने १८ षटकांत २ बाद १८४ धावा केल्या. रत्ननायके २८ धावांवर नाबाद राहिला. या विजयामुळे 'ब' गटात श्रीलंका ६ गुणांसह अव्वल स्थानावर राहून सुपर आठमध्ये गेला आहे.

## श्रीजा पाटील नृत्य स्पर्धेत अव्वल



। अलिबाग । प्रतिनिधी ।

डॉ. काशिनाथ घाणेकर रंगमंच चिपळूण येथे झालेल्या इंडियास डान्स स्पोर्ट्स चॅम्पिअनशिप फ्रेण्ड फायनलमध्ये ओम साई अकॅडमी पालीला घवघवीत यश मिळाले. त्यात श्रीजा पाटील हीने सुवर्णपदक प्राप्त केले असून तिची नेपाळ येथे इंटरनॅशनल कॉम्पिटिशनसाठी निवड करण्यात आली आहे.

## दत्तकृपा क्रिकेट संघ प्रथम मानकरी

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यांतील भवानी नडगांव येथील तरुण मित्र मंडळ व भवानी नडगाव क्रिकेट संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि ग्रामस्थ, मुंबई, महिला मंडळाच्या सहकार्याने एक दिवसीय लक्षवेधी क्रिकेट स्पर्धा भैरी भवानी क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. यादरम्यान तालुका महाड ग्रामीण असोसिएशन यांच्या नोंदनीकृत असणाऱ्या २४ संघांनी क्रिकेट स्पर्धेला सहभाग नोंदविला. शेवटच्या अंतिम स्पर्धेत दत्तकृपा क्रिकेट संघ व जय हनुमान क्रिकेट संघ खुटील यांच्यात सामना रंगला. यावेळी दत्तकृपा क्रिकेट संघाने विजय मिळवत भवानी चषकाचा मानकरी ठरला. तर, दत्तकृपा संघाकडून मालिकावीर साहिल नाकते, फलंदाज सागर होडबे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.



यावेळी क्रिकेट स्पर्धेला नवनियुक्त महाड पंचायत सदस्य संदीप खेडेकर, उपसरपंच मजर देशमुख, पोलीस पाटील अनिल किजबिले, मुंबई मंडळ अध्यक्ष आनंद दवंडे, खजिनदार सोनू अगबुल, कृष्णा मोरे तसेच मुंबई व महिला मंडळ आदी मान्यवरांनी सदिच्छा भेट दिल्या. यादरम्यान आयोजकांच्यावतीने सत्कार करण्यात आले.

## 'यंगस्टार' ठरले मैत्री चषकाचे मानकरी



■ विजयी संघांसह उत्कृष्ट खेळाडूंचे रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरव

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

एक दिवसीय क्रिकेट सामन्यांचे आयोजन पीपीएल कंपनीच्या समोर असलेले मैदानात करण्यात आले होते. या स्पर्धेत परिसरातील १२ नामवंत संघांनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेतील अतितटीच्या सामन्यात यंगस्टार पोसरी संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला असून त्यांना २० हजार रुपये रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले. तर, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या आई गावदेवी तळवली संघाला १० हजार रुपये व आकर्षक चषक आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या भैरवनाथ पौदने संघाला ५ हजार रुपये रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच, उत्कृष्ट फलंदाज म्हणून समीर मालकर, गोलंदाज म्हणून आदित्य मालकर व मालिकावीर म्हणून शैलेश महाब्दी यांना गौरविण्यात आले.

या क्रिकेट सामन्यांचे समावोलोचन प्रकाश पाटील व अशोक मालकर यांनी केले. तसेच, आयोजन हरेश पाटील, निखिल काठावले, कल्पेश काठावले, वैभव भोईर, अजय काठावले, विजय पाटील, सागर काठावले, सुशांत काठावले, प्रतीक काठावले या युवकांने केले होते. या मैत्री चषकासाठी परिसरातील सरपंच, उप सरपंच, पोलीस पाटील ग्रामस्थ यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## माणगावात उडान क्रीडा महोत्सव उत्साहात

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुका क्रीडा अधिकारी यांच्या सहकार्याने, डी. एस. कुळकर्णी फाऊंडेशन इंदापूर आणि ट्रॅक अँड बियॉन्ड मुंबई पुरस्कृत, कांश स्पार्टींग हब मुंबई आयोजित तालुकास्तरीय 'उडान क्रीडा महोत्सव' शनिवारी (दि.१४) माणगाव तालुका क्रीडा संकुल येथे उत्साहात पार पडला.



या स्पर्धेमध्ये माणगाव, तळा व महाड तालुक्यांतील शाळा, स्पोर्ट्स क्लबमधून ३२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित होते. ८ ते १७ अशा वेगवेगळ्या वयोगटातील मुला-मुलींनी विविध मैदानी स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन क्रीडाशैलीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. डी. एस. कुळकर्णी फाऊंडेशन, इंदापूरचे अमोल कुळकर्णी, ट्रॅक अँड बियॉन्ड मुंबईचे निलेश जाधव, कांश स्पोर्टींग हब मुंबईचे नितीन सावंत, स्वप्नील देसाई, अमित पाताडे, शाळांमधील क्रीडा शिक्षक आणि एस.एस. निकम इंग्लिश स्कूल व इंदापूरमधील शिक्षकांनी या स्पर्धेचे उत्तम नियोजन केले. या क्रीडा स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, तालुका क्रीडा मार्गदर्शक संजय गमरे या सर्वांचे क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य लाभले. या स्पर्धेसाठी माणगाव तालुक्यातील अनेक क्रीडाप्रेमी व मार्गदर्शक यांनी उपस्थित राहून स्पर्धकांचा उत्साह वाढविला.

## कॅनडाचा विश्वविक्रमी 'युवराज'

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

टी-२० विश्वचषकामध्ये मंगळवारी (दि.१७) 'ड' गटातील न्यूझीलंड विरुद्ध कॅनडा यांच्यात खेळला गेला. त्यामध्ये कॅनडाच्या सलामीवीराने शतकी खेळी करत अनेक विक्रम रचले आहेत.

चेन्नईमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात कॅनडाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा सलामीवीर युवराज समरा याने शतकी खेळी केली. त्यामुळे तो या स्पर्धेच्या इतिहासात शतक करणारा असोसिएट संघाचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. टी-२० विश्वचषकात असोसिएट संघाच्या खेळाडूची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या करण्याचा विक्रम यूएसएच्या ॲरॉन जोन्सच्या नावावर होता. त्याचबरोबर युवराजने हे शतक करताच पाकिस्तानच्या अहमद शहजादचा विक्रमही मोडला आहे. आता तो स्पर्धेच्या इतिहासात शतक करणारा सर्वात युवा फलंदाज ठरला आहे. समाराने ५८ चेंडूत शतक पूर्ण केले. त्याने कायले जेमिसनला चौकार मारत शतक पूर्ण केले. युवराजच्या शतकी खेळीमुळे कॅनडाने २० षटकात ४ गडी गमावत १७३ धावा केल्या. तो ६५ चेंडूत ११० धावा करत बाद झाला.

## इंग्लंडचा इटलीवर निसटता विजय

। कोलकाता । वृत्तसंस्था ।

टी-२० विश्वचषकातील 'क' गटातून इंग्लंडने सोमवारी (दि.१६) इटलीवर विजय मिळवून आगेकूच केली आहे. 'क' गटातून सुपर ८ चे स्थान निश्चित करण्यासाठी मैदानावर उतरलेल्या इंग्लंडला कोलकाताच्या इडन गार्डनवर इटलीने जेरीस आणले होते. त्यांनी इंग्लंडचा निम्मा संघ १०५ धावांत तंबूत पाठवला होता. जॉस बटलर (३), जेकब बेथेल (२३), फिल सॉल्ट (२८), कर्णधार हॅरी ब्रूक (१४) व टॉम बँटन (३०) यांना इटलीच्या गोलंदाजांनी शांत ठेवले. परंतु, विल जॅक्सने २१ चेंडूत इंग्लंडसाठी विश्वचषकातील वेगवान अर्धशतक पूर्ण केले. जॅक्सने नाबाद ५३ धावा करताना संघाला ७ बाद २०२ धावांपर्यंत पोहोचवले.





तत्पुर्वी इटलीची सुरुवात काही खास झाली नाही. पहिल्याच षटकात अँथोनी मोस्का व जेजे स्मट्स शुन्यावर बाद झाले. त्यानंतर कर्णधार हॅरी मॅनेटीला (१२) देखील माघारी परतला. त्यानंतर बेन मॅनेटीने अर्धशतक ठोकले. १२ व्या षटकात मॅनेटीने ४,६,६,४ असे फटके खेचले. परंतु, शेवटच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात मॅनेटी (६०) झेलबाद झाला. जस्टीन मोस्का (४३) याने इंग्लंडच्या गोलंदाजांना चांगला चोप दिला. त्यानंतर एकाच षटकात मार्कस कॅम्पोपियानो (२) व जिएय-पिएरो मीड (०) हे बाद झाले. १२ चेंडूंत ३० धावांची गरज असताना सॅम करनन स्टीवर्ट (४५) याला बाद केले. त्यामुळे इटलीचा संघ १७८ धावांत सर्वबाद झाला.

पश्चिम रेल्वे,महाराष्ट्र पोष्ट आमनेसामने | अंतिम फेरीच्या दिशेन विजेचा वेग

# दादर क्रीडा नगरीत रोमांचाचा ज्वालामुखी

। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने व अमर हिंद मंडळातर्फे कै. उमेश शेणॉय स्मृती चषक पुरुष व महिला व्यावसायिक 'डायनॅमिक' खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या खो-खो स्पर्धेचा अक्षरशः जंगी जल्लोष दादरमधील कै. अजितदादा पवार क्रीडा नगरीत रंगला असून प्रत्येक सामना म्हणजे थरार, जिद्द आणि विजेच्या वेगाचा अविस्मरणीय संग्राम ठरत आहे. या स्पर्धेत पुरुष गटात पश्चिम रेल्वे व महाराष्ट्र पोष्ट यांनी प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. तर, महिला गटात पश्चिम रेल्वे व मुंबई पोलीस यांनी दमदार विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

पुरुष उपांत्य फेरीत बृहन्मुंबई महानगरपालिकेने नाणेफेक जिंकून आक्रमण स्वीकारले. मात्र, त्याचा फायदा घेण्यात अपयश आले आणि पश्चिम रेल्वेने २४-१७ असा ४.३० मि. राखून ७ गुणांनी विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. विजयी पश्चिम रेल्वेच्या माधव दिपक, राहूल मंडल, आदित्य गणपुले, मजहर जमादार, वृषभ वाघ यांनी निर्णायक कामगिरी करत विजय साकारला. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात बँक ऑफ इंडियाने नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले. मात्र, महाराष्ट्र पोष्टने ३०-२३ असा ७ गुणांनी शानदार विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. विजयी महाराष्ट्र पोष्टाच्या हर्षद हातणक, आकाश साळवे, शुभम उत्तेकर, धिरज भावे, लक्ष्मण गवस यांनी संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.



### अंतिम महासंग्रामाची उत्सकुता शिगेला

स्पर्धेतील सर्व सामने आता निर्णायक टप्प्यात पोहोचले असून पुरुष अंतिम फेरीत पश्चिम रेल्वे व महाराष्ट्र पोष्ट यांच्यात विजेतेपदासाठी महासंग्राम रंगणार आहे. पश्चिम रेल्वेने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले असून अंतिम विजेतेपदासाठी त्यांचा आत्मविश्वास शिगेला पोहोचला आहे. अजितदादा पवार क्रीडा नगरीत आता अंतिम फेरीच्या महासंग्रामाची उत्सुकता शिगेला पोहोचली असून खो-खोप्रेमींसाठी हा थरार अविस्मरणीय ठरणार आहे.

त्यानंतर महिला साखळी सामन्यात मुंबई पोलिसांनी नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले आणि २२-१८ असा १० सेकंद राखून ४ गुणांनी महावितरणवर विजय मिळवला. विजयी मुंबई पोलिसांच्या पायल पवार, प्रिया भोईर, दिक्षा सोनसुतकर, ऐश्वर्या पेठे यांनी पोलीसी खाक्या दाखवत विजय निश्चित केला. महिला साखळीतील दुसऱ्या सामन्यात पश्चिम रेल्वेने नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले आणि २९-९ असा एक डाव व २० गुणांनी मुंबई पोलिसांचा धुव्वा उडवला. विजयी पश्चिम रेल्वेच्या संध्या सुरवासे, मोकाशी, अर्चना माझी, मगाई माझी, दिव्या गायकवाड, किशोरी कल्याणी कंक यांनी सामन्यावर संपूर्ण वर्चस्व राखले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)